शनिवार, २८ ऑक्टोबर २०२३
किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
मराठी दैनिक
वर्ष - ०३ अंक - ८३
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

MARATHI • DAINIK • CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) SATURDAY 28 OCT. 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | YEAR-03 • ISSUE-83 • RNI : MAHMAR/2021/82566 • PAGE-12 • PRICE-5



# तर सरकारला उद्रेक आवरता येणार नाही !

## उपोषणकर्त्यांची ठाम भूमिका : अंचलगावकर बैलगाड्यांसह भजन करत उपोषणस्थळी दाखल

आधुनिक केसरी न्यूज

**शांताराम मगर**

**वैजापूर : तालुक्यातील लोणीखुर्द येथे अंचलगाव येथील मराठा बांधवांनी बैलांची सजावट करत बैलांवर एक मराठा लाख मराठा, आरक्षण आमच्या हक्काचं, अशा प्रकारचे घोषवाक्य लिहून बैलगाडीत शेती आवजारे भरून टाळ मृदंग घेऊन भजन करीत भव्य रॅलीने उपोषणस्थळी दाखल झाले. लोणीखुर्द सर्कलमध्ये प्रत्येक दिवशी एक गाव व परिसरातील बहुसंख्य नागरीक साखळी उपोषण करत आहेत. यात व्याख्यान, कीर्तन, भजनाचे देखील आयोजन करण्यात आले आहे. मराठा आरक्षणासाठी मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनास पाठिंबा म्हणून राज्यभरात आंदोलन केले जात आहे.**

संभाजीनगर जिल्ह्यातदेखील पडसाद उमटताना पाहायला मिळत आहेत. याचाच एक भाग म्हणून वैजापूर तालुक्यातील प्रत्येक ग्रामपंचायतीसमोर तसेच प्रत्येक सर्कलमध्ये साखळी उपोषण करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तसेच मागण्या मान्य न झाल्यास त्याच ठिकाणी बेमुदत आमरण उपोषण करण्याचा इशारा देण्यात आला आहे. मराठा आरक्षणासाठी सुरू असलेल्या आंदोलनाचे लोण आता गावागावांत पाहायला मिळत आहे. तालुक्यातील प्रत्येक सर्कल तसेच ग्रामपंचायतसमोर मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी साखळी उपोषण केले जाणार आहे. या उपोषणात गावातील तरुण, वृद्ध आणि महिला सहभागी होताना दिसत आहेत. मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गातून आरक्षण देण्याची प्रमुख मागणी यावेळी करण्यात येत आहे. उद्या सकाळपासूनच तालुक्यातील अनेक सर्कलमध्ये ग्रामपंचायतीसमोर उपोषण सुरू झाल्याचे पाहायला मिळणार आहे. पुढील दिवसांत मागण्या मान्य न झाल्यास तसेच जरांगे पाटील यांना काही झाल्यास होणारा उद्रेक सरकारला आवरता येणार नाही, असा इशारादेखील मराठा समाज बांधवांनी दिला आहे.

**उपोषणकर्त्यांच्या मागण्या :** मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गातून आरक्षण देण्यात यावे . त्यासाठी केंद्रात आणि राज्यात भाजप आघाडीचेच सरकार असल्याने संसदेत अध्यादेश काढून निर्णय घेण्यात यावा . सुप्रीम कोर्टात प्रलंबित असल्याचे कारण सांगून समाजाची फसवणूक करू नये .
मराठा समाजातील युवकांवर आंदोलनासह, आंतरवली सराटी आणि राज्यात इतर ठिकाणी दाखल झालेले गुन्हे तत्काळ मागे घेण्यात यावेत, अशी मागणी उपोषणकर्त्यांनी केली आहे .

**आयोजकांच्या वतीने नियमावली सर्वांना बंधनकारक**

1 . मी संघर्षयोद्धा मनोज जरांगे पाटील यांचा आदेश मानणार .
2 . मी माझ्यामुळे माझ्या समाजाला व इतरांना माझ्यामुळे काहीही त्रास होऊ देणार नाही .
3 . मी जेथे कमी तेथे आम्ही अशी भूमिका मी घेणार .
4 . मी माझ्या सर्व बांधवांना सहकार्य करेल आणि त्यांच्याशी सहकार्याने राहीन .
5 . मी पाण्याच्या बाटल्या पिशव्या किंवा कचरा कुठेही फेकणार नाही व परिसर स्वच्छ ठेवेन .
6 . मी कुठलेही व्यसन उपोषणस्थळापासून 200 मीटर परिसरात करणार नाही .
7 . माझ्या गावाचा जो दिवस ठरेल त्या व्यतिरिक्त मला उपोषणस्थळी यायचे असल्यास मी येईन पण मी ज्या गावात सहभागी होईल त्यांचे नियोजन मला मान्यच असेल .
8 . येणाऱ्या गाड्या बांधवांच्या गाड्या शिस्तीत असण्यासाठी मी प्रयत्न करेल .
9 . मी माझे वाहन गाड्या जोरात चालवणार नाही इतरांना सावकाश सुरक्षित सोबत घेऊन जाईल
10 . मोबाईल किंवा माझ्या आवाजाने मी इतरांना अडथळा आणणार नाही .
11 . मराठा समाज कुणाच्या विरोधात नाही त्यामुळे मी प्रक्षोभक बोलून उद्रेक करणार नाही .
12 . सर्वांना माझ्याकडून माहिती सांगत असताना अचूक, सत्य आणि मला माहिती असणारीच माहिती मी सांगेन खोटी माहिती देणार नाही .
13 . ज्यांचा उपोषणाला पाठिंबा आहे त्या सर्व जाती– धर्माच्या समाज बांधव उपोषणस्थळी उपस्थित राहू शकतात . हा लढा शासन व्यवस्थेशी आहे .

# संतप्त मराठा आंदोलकांकडून खासदार चिखलीकरांच्या गाड्यांची तोडफोड

आधुनिक केसरी न्यूज

**सचिन मोरे**


**कंधार :** माजी जिल्हा परिषद सदस्य मनोहर पाटील तेलंग यांच्या तब्येतीची चौकशी करण्यासाठी गेलेल्या खासदार प्रताप पाटील चिखलीकर यांच्या दोन गाड्यावर संतप्त मराठा आंदोलकांनी हल्लाबोल चढवत गाड्यांच्या काचा फोडल्याची घटना कंधार तालुक्यातील आंबुलगा येथे गुरुवार दि.२६ ऑक्टोबर रोजी रात्री १०:३० च्या सुमारास घडली. यामुळे मराठवाड्यात एकच खळबळ उडाली असून हल्ला झालेल्या दोन गाड्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. खासदारांसह त्यांच्या सोबत असलेल्या वाहनांची देखील यावेळी तोडफोड करण्यात आली. सुदैवाने यात कुणालाही इजा झाली नाही. खासदारांच्या सोबत असलेल्या पोलीसांनी तणाव निवळण्यासाठी तातडीने प्रयत्न केले. त्यामुळे कुठलाही अनुचित प्रकार घडला नाही.मात्र तोडफोडीत दोन वाहनांचे मोठे नुकसान झाले आहे.

संतप्त मराठा आंदोलनकर्त्यांनी घोषणा देत चुलीत गेले नेते,चुलीत गेला पक्ष,एक मराठा लाख मराठा असा नारा देत मराठा आंदोलकांनी सर्वच राजकीय पक्षाच्या पुढाऱ्यांना गाव-बंदी केली आहे, अशा प्रकारची गाव-बंदी कंधार तालुक्यातील आंबुलगा येथील गावकऱ्यांनी तहसीलदार व प्रशासनास लेखी निवेदनाद्वारे पुढाऱ्यांनी आंबुलगा गावात प्रवेश करू नये असे लेखी निवेदन देण्यात आले होते. आंबुलगा येथे खा.प्रताप पाटील चिखलीकर हे आपल्या काही कार्यकर्त्यांसह माजी जिल्हा परिषद सदस्य मनोहर पाटील तेलंग यांना भेटण्यासाठी ते गुरुवारी उशिरा आंबुलगा येथे आले होते. चिखलीकर तेलंग यांना भेटण्यासाठी घरात गेले असता घराबाहेर संतप्त मराठा समाजाच्या कार्यकर्त्यांनी गावात मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती, त्यातील संतप्त कार्यकर्त्यांनी घोषणाबाजी करत गाड्यावर दगड-फेक



केली, त्यामुळे दोन गाड्यांचे काचा फुटून व मार लागून मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. हा प्रकार घडल्यानंतर उपस्थित आंदोलनकर्ते व पोलीसांमध्ये चांगलीच बचाबाची झाल्याचे ऐकावयास मिळाले. या घटनेमुळे आंबुलगा गावामध्ये तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

**अद्याप गुन्हा दाखल नाही :** सदरील प्रकरणाचे वृत्त लिहीपर्यंत कंधार पोलीस स्टेशन मध्ये कोणत्याच प्रकारचा गुन्हा दाखल करण्यात आलेला नव्हता . महाराष्ट्रा मध्ये अनेक गावांमध्ये मराठा समाजाच्या वतीने राजकीय नेत्यांना गावबंदी करण्यात आली आहे . त्यामुळे मंत्री, खासदार, आमदार या लोकप्रतिनिधींना अशा प्रकारे मराठा आंदोलकांच्या रोषाला सामोरे जावे लागत आहे .




**सदैव मराठा समाजासोबतच : खा .चिखलीकर**

मराठा समाजाला आरक्षण मिळावे या मागणीला आमचा देखील पाठिंबा आहे समाजामुळेच आम्ही आज या पदावर काम करीत आहोत . आज मराठा आंदोलकाच्या भावना अतिशय संतप्त व तीव्र असून त्या भावना खऱ्या आहेत, त्यांच्या विचाराशी मी देखील सहमत आहे . माझा कोणावरही राग नाही, अशा प्रकारच्या भावना नांदेडचे खा .प्रताप पाटील चिखलीकर यांनी सदरील प्रतिनिधीशी बोलताना व्यक्त केल्या आहेत .









विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932




आधुनिक केसरी

रामायण, महाभारत, भगवद्गीता, भागवत यासारखे ग्रंथ, पाणिनीचे व्याकरण, भरतमुनींचे नाट्यशास्त्र आणि इतरही सगळे मौल्यवान ग्रंथ आपल्यापर्यंत पोहोचले ते केवळ लेखनकला मानवाला अवगत झाल्यामुळे. इराकमधील मेसोपोटेमिया या इ.स. पू. ३४०० वर्षांपूर्वीच्या सुमेरियन संस्कृतीत लेखनकला विकसित झाली असे सांगितले जाते. पण त्यापूर्वीही दोन शतके ती इजिप्तमधील नाईल नदीच्या खोऱ्यातील लोकांना अवगत होती असे मानले जाते इतकी ती प्राचीन आहे. पण काही असो लेखनकलेने जीवनाच्या सर्व क्षेत्रात क्रांती घडवली. त्यामुळेच विविध विचारवंतांचे विचार आपल्यापर्यंत पोहोचले. शिलालेख आले, मृत्युलेख आले. इच्छापत्र आले आणि मृत्युपत्रही आले. प्रेमी जीवांनी एकमेकांना लिहिलेली प्रेमपत्रं आली. रुख्मिणीनं श्रीकृष्णाला लिहिलेलं प्रेमपत्रं त्यामुळेच लिहिलं गेलं. चांगदेवांनी ज्ञानेश्वरांना लिहिलेलं ( अर्थातच कोरं ) पत्रही आलं. कविता, लेख, कादंबऱ्या, चरित्रं, आत्मचरित्रं आली. साहित्यविश्व समृध्द झालं. पूर्वी शाळेमध्ये लहान मुलांना अक्षर चांगलं करण्यासाठी कित्ता गिरवायला लावीत. त्यासाठी बोरू किंवा टाकाचा वापर केला जात असे. आजच्या मुलांना बोरू, टाक, दौत इ. गोष्टी दाखवण्यासाठी वस्तुसंग्रहालयातच घेऊन जावं लागेल. पण पूर्वी जे कित्ते गिरवले जायचे त्यावरून एखाद्या व्यक्तीच्या वागण्याबोलण्याचे अनुकरण केले की त्याने अमुक व्यक्तीचा ' कित्ता गिरवला ' असा शब्दप्रयोग रूढ झाला. आपणही चांगल्या व्यक्तींचा कित्ता गिरवायला हरकत नाही. ज्ञानेश्वर माउली म्हणतात, ' ऐसी अक्षरे रसिके मेळवीन ' आपणही हे अक्षरब्रह्म जपू या. लिहू या, वाचू या. काळाच्या कसोटीवर उतरणाऱ्या, चिरकाल टिकणाऱ्या आणि युगांयुगांचा दीपस्तंभ असलेल्या वांङ्मयाला आपण अक्षरसाहित्य म्हणतो. अक्षरसाहित्य हा आपला वारसा आहे, संस्कृती आहे. हे अक्षरब्रह्म आपल्या जीवनाला समृद्धीकडे घेऊन जाणारे आहे. शर्वरीला प्रसिद्ध शास्त्रज्ञ स्टीफन हॉकिंग यांची आठवण झाली स्टीफन हॉकिंग यांना आपल्या आजारामुळे अन्य काही करणं शक्य नव्हतं परंतु आपल्या बोटांच्या हालचालींचा आधार घेऊन आपले विचार ते मांडत होते त्यांची आठवण झाली आणि तिच्या चेहऱ्यावर स्मित झळकलं. सुषमानं दिलेली डायरी शर्वरीनं हातात घेतली आणि अक्षरब्रह्माची आराधना करण्यात ती रंगून गेली.



## आनंदी पहाट

## प्रत्येक व्यक्तीत कायम कलाकृती शोधावी

आधुनिक केसरी



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

व्यक्ती तितक्या प्रकृती, त्यामुळे एकाच कुटुंबातील प्रत्येक व्यक्तीच्या आवडीनिवडी, सवयी, मानसिकता हे देखील सर्व भिन्न असतं. या भिन्न विभिन्न मानसिकतेचा विचार करून सकारात्मकता आणि एकता निर्माण करावी लागत असते. यामध्ये कुटुंबातील प्रत्येक सदस्याचा कस लागत असतो. अंतर्मनाच्या आणि मानसशास्त्रीय दृष्टीकोनातून रंग शास्त्राचा खूप मोलाचा वाटा असतो. रंगांचा संबंध थेट अंतर्मनाशी असतो. विविध रंग अंतर्मनाला जाऊन भिडणारे असतात. प्रत्येक रंगामुळे आपल्या अंतर्मनात निरनिराळे भाव प्रकट होत असतात. निरनिराळ्या रंगांमुळे निर्माण झालेल्या आपल्या भावना आपण उत्स्फूर्तपणे व्यक्त करत असतो. त्यामुळेच रंगशास्त्र आपल्या जीवनांत अत्यंत महत्वाची भूमिका बजावत असतात. कोणत्या रंगाचा कोठे, कसा, किती, का आणि केव्हा वापर करायचा हे पाहाणे अत्यंत आवश्यक असतं. प्रत्येक व्यक्तीच्या आवडीप्रमाणे रंगाची पसंती केली जात असते. याचा प्रत्यय आपल्याला दैनंदिन जीवनात प्रत्येकाच्या पेहरावाच्या निवडीवरून दिसून येतो. एखाद्याला एखाद्या दिवशी निळ्या रंगाचे कपडे वापरावेसे वाटतील तर दुसऱ्याला पिवळ्या रंगाचे. अर्थातच हे प्रत्येक व्यक्तीच्या मानसिकतेवर अवलंबून असतं. अनेकदा आपल्या शारीरिक दुखण्यामागे खरं तर मानसिक अस्वस्थता कारणीभूत असते. रक्तदाब, मधुमेह, हृदयरोग असे मोठे आजार अथवा डोकेदुखी, अंगदुखी, मळमळ, चक्कर अशी छोटी दुखणी अनेकांना त्यांच्या मानसिकतेमुळे उद्‌भवलेली असतात. आपण आपलं मानसिक स्वास्थ्य मिळवणं आणि ते टिकवून ठेवणं हे सर्वस्वी आपल्याच मानसिकतेवर, अंतर्मनातील विचारांवर अवलंबून असतं. आपल्या अंतर्मनाला आनंदी ठेवण्यातच आपलं मानसिक स्वास्थ्य टिकवून ठेवता येतं. तो आनंद आपण स्वतःच निर्माण करायचा असतो. आपल्याला दैनंदिन जीवनात निरनिराळे अनुभव येत असतात, ज्यामुळे आपली मानसिकता बदलत असते. या बदलत जाणाऱ्या मानसिकतेच्या अनुशंगानं सकारात्मक विचार करण्याची जरुरी असते.



आधुनिक केसरी

**पालखीचा भोई | मीच व्हावा ||**
पंढरीच्या वाटे | होती भक्त दंग ||
पालखीचा संग | लाभो आम्हा ||१||
चराचरी दिसे | रूप चैतन्याचे ||
भक्ती रंग साचे | अंतरात ||२||
संसारी दुःखाला | दिंडीचा आधार ||
आनंदाचे घर | सत्कर्मात ||३||
मृदुंग सांगतो | जगण्याचे सार ||
भक्तीचे हे सूर | आत्मरूप ||४||
आता नको फेरा | जन्म-मरणाचा ||
भोई पालखीचा | मीच व्हावा ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## निरुपण

आधुनिक केसरी

मग ते दुर्दशा सांगतां ।शंका बाधी ॥२८॥
ऐसिये कारागृहीं वस्ती ।नवमास बहु विपत्ती ।
नवहि द्वारें निरोधती ।वायो कैंचा तेथें ॥२९॥
वोका नरकाचे रस झिरपती ।ते जठराग्नीस्तव
तापती ।तेणें सर्वहि उकडती ।अस्तिमांस ॥
३०॥




डॉ. चन्द्रहासशास्त्री
सोनपेठकर

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

ज्ञान योगी वे सद्गुरु, कर्मयोगी होय नाहिं ।
सद्गुरु बन्धन काटते, मोह शोक सब
जाहिं ।।४८।।(स्वर्वेद द्वितीय मण्डल प्रथम
अध्याय) ०२/०१/४८

मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :
सद्गुरु ज्ञान योगी असतात कर्म योगी नाही. ज्ञान योगी सद्गुरुच प्रकृती-बंधन तोडतात, ज्याद्वारे सर्व मोह-शोक क्षय होतात. कर्म योग्याचा संसार मायेशी संबंध असूनही आतून मात्र त्याग असतो आणि ज्ञान योग्याचा संसार मायेशी बिल्कुल संबंध असत नाही, अर्थात ज्ञान योगी अंतर्बाह्य त्यागी असतात. हाच दोघांमधील फरक आणि ज्ञान योग्याची सर्वश्रेष्ठ महिमा आहे. जगत वंद्य सद्गुरु ज्ञान योगी असतात. हाच या दोह्याचा भाव आहे.



स्वर्वेद रचनाकार
अनन्त श्री सद्गुरू
सदाफल देवजी
महाराज

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास
वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.

## शारदीय नवरात्र (माळ सातवी)

आधुनिक केसरी



सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

आता आपण पुढच्या भागाकडे वळूया. लावण्यवती व शस्त्रसंभारासह रत्नालंकारासहित परिपूर्ण तेजशलाका पाहिल्यावर देवगणांना हर्ष झाला. त्यांना प्रत्यक्ष मातेचे दर्शन झाले. आई आता आपले दुःख दूर करणार याची त्यांना खात्री होती. हर्ष वेगळा तो अजून काय पाहिजे. हर्षोल्हास व गगनभेदी आरोळ्यांनी देवी मातेचा जयजयकार केला.ह्या जयजयकाराची गर्जना ऐवढी मोठ्ठी होती की त्याचा आवाज पार आकाशापार पोहचला.आकाशातचं नाही तर तिन्ही लोक आणि समुद्र तळाशी पाताळ लोकांत तो पोहोचला. प्रचंड उन्माद-नादांनी समुद्रातील लाटा पर्वतप्राय उसळल्या. या जयजयकार प्रतिध्वनी मुळे पृथ्वी डोलू लागली कारण आपल्याच लेकरांवर होत असलेले अन्याय तिलाही बघवत नव्हता भूकंप झाले. पर्वताला हादरे बसून ज्वालामुखी उसळले संपूर्ण विश्वात कोलाहल माजला. अत्यंत प्रसन्नता पूर्वक आणि स्नेहभावाने देवांनी सिंहवाहिनी देवीचा पून्हा पून्हा जयजयकार केला.

## जालिंदरनाथ




अग्निदेवाचा प्रसाद म्हणून त्या राजाने त्याचा सांभाळ केला जालिंदर नाथ 12 वर्षाचे झोके असता त्यांचे मन संसारात त्या राजवाड्यात लागेल म्हणूनते घर सोडून निघून आले घर सोडून आल्यावर ते राणा वनात फिरत असताना ते एक वनात थांबले व त्याच वेळेस तेथे वणवा लागला व संपूर्ण जंगलाला आग लागली सगळी कडे अग्नी पसरला त्या वनव्यातून जालिंदर नाथ इकडे तिकडे पळत असतांना अग्नी देवाचे लक्ष जालिंदर नाथ वरती पडले आणि त्याच वेळेस अग्नी देवाला त्यांची ओळख पटली व त्यांनी ओळखले की हा तर आपलाच पुत्र आहे पिता पुत्रा ची भेट झाली.

## देहाला भगवंतप्राप्ती करिताच सांभाळावे

आधुनिक केसरी

देहाला सांभाळणे जरूर आहे; परंतु भगवंतप्राप्ति करिता ते करावे, विषयासाठी नाही करू. बाहेरचा लौकिक सांभाळला पण होते नव्हते ते घालविले, यात काय मिळविले ? हा वेडेपणा म्हणायचा. आतल्या खोबऱ्याचे रक्षण करण्याकरिता करवंटीची जरूरी आहे. केवळ बाह्यांगाचीच जपणूक करणे हेच काही मनुष्याचे अंतिम उद्दिष्ट नाही. बाह्यांगाचे सुख हे काही खरे नाही. 'मी, माझे' यापासून आपण द्वैताला सुरुवात करतो, कल्पनेने जेवढे समजेल तेवढे पाहू लागतो; परंतु शेवटपर्यंत 'मी कोण' याचा आपल्याला पत्ता लागत नाही. आपली चूक झाली असे समजले म्हणजे दुरुस्त करण्याचा मार्ग पहावा. जिथून आपली वाट चुकली तिथे परत यावे लागते. 'मी देही' असे म्हणू लागलो, इथे वाट चुकली. असत्याला सत्य मानले ही आपली चूक झाली. विषयामध्ये सुख आहे ही आपण कल्पना केली, त्याचा अनुभव आपण अनेक वेळा घेतला, तरी अजून आपली ही कल्पना खरी का खोटी हे आपल्याला कळत नाही, हे मात्र और आहे. खरोखर, प्रपंच हा



टिपऱ्यांच्या खेळाप्रमाणे आहे. टिपऱ्यांच्या खेळात एकाला टिपरी दिली की, तो लगेचच पुढच्या गड्यापाशी जातो, त्याप्रमाणे हा प्रपंच स्थिर नसून सारखा बदलणारा आहे. आपले जन्म आणि मरण एक प्रकारे रोज घडत असते. आपण निजलो, झोपी गेलो, की मरण समजावे; आणि उठलो, जागे झालो की आपला जन्म झाला असे समजावे. एखाद्या तुरुंगात पुष्कळ कैदी असतात; कुणी काही, कुणी काही केलेले असते, हे खरे; तरी जे करू नये ते प्रत्येकाने केलेलेच असते ही गोष्ट निश्चितच आहे. त्याप्रमाणे, जगात जे लोक दुःख भोगतात त्यांनी मागील जन्मी अमुक एक कर्म केले हे जरी समजले नाही तरी, जे करू नये ते त्यांनी केले आहे, ही गोष्ट निश्चित. परंतु त्यामध्ये भगवंताने एक मोठी सोय ठेवली आहे, ती ही की, जो देहाला विसरेल त्याला त्या दुःखाची जाणीव होणार नाही. जगातल्या दुःखाचा प्रश्न हा मानवी तर्काला समाधानकारकपणे न सुटणारा प्रश्न आहे. म्हणून त्याबद्दल फार विचार न करता जगातले दुःख शक्यतो कमी करण्याचा प्रयत्न करावा. ज्याला देवाची पूर्ण आठवण असते त्यालाच जगाचा, दुःखाचा विसर पडतो, जो स्वतःला पूर्णपणे विसरतो त्यालाच भगवंताची प्राप्ति होते. स्वतःला पूर्णपणे विसरायला भगवंताच्या नामात रंगून जाणे हा एकच उपाय आहे. जेवढ्या उत्कटतेने नाम घेऊ तितके अधिकाधिक आपण नामात गुंतले जाऊ; मग देहाची आठवण कशाला राहील ? आपण नाम घ्यावे तें आपणच आपल्या कानांनी ऐकावे आणि ते घेता घेता शेवटी त्यात स्वतःला विसरून जावे हाच आनंदाचा मार्ग आहे.

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
शनिवार, २८ ऑक्टोबर २०२३



हाताने मैला साफ करण्याच्या प्रथेचे उच्चाटन व्हावे

पान ६



श्रध्दांजली

पान ७





# राष्ट्रवादी काँग्रेसच्या रिसोड तालुकाध्यक्षपदी अशोक जाधव तर मालेगाव तालुकाध्यक्षपदी सुशांत जाधव

आधुनिक केसरी न्यूज

**वाशिम :** राज्यात राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये फुट पडल्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेसची सरळ सरळ दोन गटात विभागणी झाली आहे. जिल्ह्यात पक्ष बांधणी साठी दोन्ही गटाकडून निष्ठावंत कार्यकर्त्यांना विविध पदाच्या जबाबदाऱ्या देवुन पक्ष संघटन वाढविण्यावर विशेष भर दिला जात आहे. राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या गटांकडून रिसोड तालुकाध्यक्षपदी अशोक जाधव तर मालेगाव तालुकाध्यक्षपदी सुशांत जाधव यांची नियुक्ती करण्यात आली असल्याची माहिती पक्षाचे जिल्ह्यातील युवा नेते प्रा. प्रशांत पाटील गोळे यांनी प्रसिध्दी पत्रकान्वये दिली आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे ध्येय धोरण व पक्षाचे अध्यक्ष अजित पवार यांची विचारधारा सर्व जातीधर्माच्या अखेरच्या घटकापर्यंत पोहचविण्याचे कार्य अधिक जोमाने करण्यासाठी २२ आक्टोबर रोजी राष्ट्रवादी काँग्रेसचे वाशिम जिल्हाध्यक्ष हाजी मो युसुफ पुंजानी यांच्या अध्यक्षतेखाली कारंजा येथे आढावा बैठक घेऊन, पदाधिकारी निवड व नियुक्ती पत्र वितरण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी माजी नगराध्यक्ष श्री दत्तराज डहाके, माजी सभापती श्री जयकिसन राठोड, पक्षनिरक्षक श्रीमती सोनालीताई ठाकूर, पक्ष निरक्षक श्री अशोक परळीकर, प्रा. प्रशांत सुधीर गोळे, श्री देवव्रत डहाके, समाज कल्याण सभापती श्री अशोक डोंगरदिवे, रिसोडचे माजी नगराध्यक्ष श्री अरुण क्षीरसागर आदीसह, पक्षाचे आजी माजी सर्व पदाधिकाऱ्यांची प्रमुख उपस्थिती होती. सदर कार्यक्रमात जिल्हा उपाध्यक्षपदी श्री अनिल संजाबराव खानझोडे यांची नियुक्ती करण्यात आली असून, रिसोड तालुका उपाध्यक्षपदी श्री गजानन हरिभाऊ बाजड, श्री सुनिल किसनराव बाजड यांची नियुक्ती करण्यात आली आहे. तर तालुका सचिवपदाची जबाबदारी श्री दिनकर अनंतराव गोळे यांच्यावर सोपविण्यात आली असल्याची माहिती प्रा. प्रशांत सुधीर पाटील गोळे यांनी दिलेल्या प्रसिध्दी पत्रकाद्वारे दिली आहे.



# अरे खोप्यामधी खोपा सुगरणीचा चांगला, देखा पिलासाठी तिनं झोका झाडाले टांगला

आधुनिक केसरी न्यूज

**गोकुळसिंग राजपूत**

**सोयगाव :** तालुक्यात व सावळदबारा डोंगराळ भाग असल्याने 'अरे खोप्यामधी खोपा, सुगरणीचा चांगला, पिलासाठी तिने झोका झाडाला टांगला' अशा शब्दांत सुगरणीच्या कौशल्याला शब्दबद्ध करणाऱ्या ग्रामीण कवयित्री बहिणाबाई चौधरी यांच्यामुळे सुगरणीचा खोपा सर्वत्र परिचित झाला. मात्र ग्रामीण भागांत पावलोपावली सर्वत्र दिसणारे सुगरण व इतर पक्ष्यांची घरटी वाढत्या वृक्षतोडीसह विहिरीत लोंबकळणाऱ्या झुडपाचीही तोड झाल्याने पशुपक्षी, सुगरणी अन्यत्र स्थलांतरीत होऊन त्यांच्या खोप्यांना कडुलिंब, बाभुळ, पिंपळ, बदाम, हिवरांच्या झाडांनी आपल्याकडे आकर्षित करून कवेत घेतले. रस्त्याने जाताना झाडां-झाडांवर लोंबकळणारे सुगरणीचे खोपे वाटसरूंना आपल्याकडे आकर्षित करत असल्याचे चित्र वरुळ सोयगावसह परिसरात चौफेर पाहवयास मिळते.

प्रत्येक पक्ष्यांना त्यांची अंडी व पिलांची जोपासना करताना सुरक्षिततेची काळजी असते. त्यामुळे सुगरण पक्षाचे घरटे बोरी, सुबाभळी आदी काटेरी झाडं किंवा जेथे साप, मुंगूस, माणूस, शिकारी पक्षी जाणार नाहीत अशा विहिरीकाठच्या झुकलेल्या झाडांवर ते खोपे तयार करतात. कारण त्यांची अंडी व पिलं खाणारे साप, मुंगूस, शिकारी पक्षी यांच्याबरोबरच घराच्या बेडरूम, ऑफिसची शोभा वाढवण्यासाठी त्यांचे खोपे चोरणाऱ्या माणसांचीही त्यांना भीती असते. गवताच्या काड्या गोळा करून विहिरीकाठी असलेल्या पिंपळ, बाभळ, बोर, काटेरी झुडपं, कडुलिंब आदी विहिरीपेक्षा उंच व विहिरीत झुकलेल्या झाडाच्या फांदयास घरटी बनवण्यासाठी सुगरण पक्षी पहिली पसंती दाखवतो. मात्र मागील अनेक वर्षापासून वृक्षतोड आणि विहिरी, बारवा कमी झाल्याने त्यांनीही बदल स्वीकारला आहे. बेसुमार वृक्षतोड, विहीरीऐव जी घेतल्या जाणाऱ्या कूपनलिका, नदी पात्रातून केली जाणारी पाईपलाईन आदीमुळे सुगरणीच्या पारंपरिक वसाहती सुंकटात सापडल्या आहेत.ते पण काळानुरूप या बदलांशी जुळवून घेत आहे. हे पक्षी आता आपली घरटे बनविण्यासाठी जागा बदलत आहे. बेसुमार झालेल्या वृक्षतोडीने सुगरणीच्या खोप्याची आता कूसच बदलली आहे. हळुहळू आता काळाच्या ओघात जागोजागी दिसणारे घरटे लुप्त होत आहेत. घरटीसाठी सुरक्षीत वाटणारी विहीरी काठची जागा आता त्यांना अडगळीची व असुरक्षित वाटत आहे. या सुगरणीने बनवलेल्या घरट्यात वरच्या बाजूने प्रवेश असतो. तर सुगरणीच्या खोप्याचे प्रवेशद्वार खालच्या बाजूच्या पोकळीतून असते. त्यांची कलाकुसर पाहुन माणसांला हेवा न वाटावा हे नवलच म्हणावे लागेल. यंदा उंच तर काही बुटक्या झाडाच्या वेगवेगळ्या फांद्यांना सुगरणाने किमान आठ ते दहा घरटे बांधल्याचे दिसून येते.

विहीरीजवळील झाडे, गर्द हिरवाईच्या ठिकाणी सुगरणीची किलबिलाट ऐकावयास मिळतो, अगदी वादळी वारे, अन् मुसळधार-पावसात सुगरणीची घरटी फांदीला घट्ट बांधलेले असल्याने सुरक्षित राहतात. सुगरणीची घरटे बांधण्याची कला मानवाला अचंबित करणारी आहे.

# नादुरूस्त बस घेऊन जाणाऱ्या एसटीला धडक

आधुनिक केसरी न्यूज



**बुलढाणा :** खामगाव तालुक्यातील पिंपळगाव राजा परिसरात घडलेल्या विचित्र अपघातात एक चालक ठार तर दुसरा गंभीर जखमी झाला. राहुड फाट्याजवळ आज शुक्रवारी (दि २७) ही दुर्घटना घडली. एसटी महामंडळाच्या खामगाव आगाराची बस (एमएच ६ एस ८२५६) प्रवासादरम्यान बिघडली. आगाराची दुसरी बस (एमएच ४० क्यू ६१३०) टोचन करून या बसला खामगाव कडे येत होती. दरम्यान समोरून येणाऱ्या (एम एच ०४ /८८५५ क्रमांकाच्या) मालवाहू वाहनाने बसला भरवेगात धडक दिली. यामुळे ट्रकचालक नईम शहा कयूम शहा (रा. राजूर, ता मोताळा जिल्हा बुलढाणा) हा जागीच दगावला. बसचालक अरविंद दामोदर (जळका भडंग ता खामगाव) हा गंभीर जखमी झाला. तसेच बसचे ४५ हजार रूपयांचे नुकसान झाले. दामोदर याने दिलेल्या तक्रारीवरून पिंपळगाव राजा पोलिसांनी (मृतक) नईम विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.



## सुप्रियाताईंचा निशाणा

आधुनिक केसरी

राष्ट्रवादी काँग्रेसच्या खासदार सुप्रिया सुळे शुक्रवारी सिंधुदुर्ग जिल्ह्याच्या दौऱ्यावर होत्या. त्यांनी सिंधुदुर्गात भाजप आणि शिंदे गटावर सडकून टीका केली. यावेळी त्यांनी नोटबंदीचा मुद्दा उपस्थित करत मंत्री दीपक केसरकर यांचे नाव न घेता निशाणा साधला. विशेष म्हणजे सुप्रिया सुळे यांनी आपण दिल्लीत जावून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडे कोकणातील एका बड्या नेत्याची तक्रार करणार असल्याचे म्हटले आहे. त्यामुळे राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले. सुप्रिया सुळे यांना नेमके काय बोलायचे आहे, पैशांवरुन त्यांना नेमके काय सुचवायचे आहे? अशी चर्चा आता रंगली आहे. मी जन्मापासून सिंधुदुर्गात येत आहे. माझ्या आई-वडिलांना कोकणातला हा भाग सर्वात जास्त आवडतो. राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार हे रायगड जिल्हा बँकेच्या कार्यक्रमाला गेले आहेत. तर मी संघटनेच्या कामाला आले. कोकणातल्या रस्त्याचा प्रश्न अजून सुटत नाही. कोकणातल्या रस्त्यांवर आता कौल लावा, असा टोला सुप्रिया सुळे यांनी मुंबई-गोवा महामार्गाच्या रखडलेल्या कामावरून लगावला. माझे भांडण फक्त भाजपशी आहे. ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे भाजपला भ्रष्ट जनता पार्टी म्हणतात. भाजप भ्रष्ट जुमला पार्टी आहे. पंतप्रधान या पदाला मोठा मान आहे. भारतातल्या शेतकऱ्यांसाठी शरद पवार यांनी काय नाही केले ते सांगा. कुठले मोदी खरे आहेत? शरद पवारांचे कौतुक करणारे की काल बोलणारे? महाराष्ट्रात आल्यावर टीका कोणावर करणार? तर शरद पवार यांच्यावर? हेडलाईन करण्यासाठी शरद पवार यांच्यावर टीका करतात. टीका करून प्रश्न सुटत नाहीत, अशी टीका सुप्रिया सुळे यांनी केली. सर्वात जास्त भ्रष्टाचार हा भाजपमध्ये आहे. शिंदे सरकार दारूची दुकान वाढवते. शिक्षण खात्याचा दर आठवड्याला एक जीआर निघतो. शिक्षणाला सरकारने हलके फुलके घेतले. शाळा कमी करून दारूची दुकाने वाढवायची, असे धोरण सुरु असल्याची टीका सुप्रिया सुळे यांनी केली. हळू बोलण्यावरून सुप्रियाताई सुळे यांनी दीपक केसरकर यांची नक्कल केली. पाठीत खंजीर खुपसल्यावर हळू बोलणारा काय होता हे समजते. मुख्यमंत्रीपद तुम्ही ओरबाडून घेतले. शिवसेना मोठी झाली याचा आम्हाला आनंद आहे. त्यांना काय अधिकार ठाकरे यांच्याकडून पक्ष काढून घ्यायचा? असा सवाल सुप्रिया सुळे यांनी केला. सर्वात मोठी ताकद इमानदारीची आहे. दहा वर्ष तुम्ही एक एमआयडीसी आणू शकले नाहीत. पीआरओ पाहिजे की आमदार पाहिजे? असादेखील सवाल सुप्रिया सुळे यांनी केला.

## कोजागिरीचा चांदवा

आधुनिक केसरी



प्रा.भावना गांधिले
संपर्क क्र. ८२०८१७६०१४

**पौर्णिमा म्हटलं की आकाशातील सर्व काळोख दूर सारून प्रकाश त्याचे अस्तित्व निर्माण करत असतो. ढगाच्या चिरेबंद रांगातून चंद्र आपली शितल किरणे घेऊन चांदण्यासवे नभमंच विराजमान होत असतो. अतिशय लोभसवाणे हे दृश्य पाहून उल्हासित होऊन जाते. तो चांदवा धरेवर पडताच धरा ही रोमांचित होते. सागराच्या लाटेवर ही चंद्र किरणे स्वार होऊन किनाऱ्याला स्पर्श करून न्यारे संगीत छेडत राहतात. ऐरवी हे चांदण्यांनी रत्नजडित होणारे आकाश कोजागरीच्या रात्री काही न्यारेच दिसते. कोजागिरी ही वर्षातील सर्वात मोठी व पवित्र पौर्णिमा मानली जाते. अश्विन महिन्यात येणाऱ्या या पौर्णिमेला कोजागरी म्हणून ओळखले जाते. या दिवशी चंद्र आपल्या अगदी नजदिक असतो.**

या पौर्णिमेला शरदातील निरभ्र आकाशात चंद्र आपले वैभव उधळून देतो. आणि पिठूर चांदणे नभी पडते. कोजागिरीला कौमोदीचा शुभ्र विलास जेव्हा दृष्टीस पडतो; तेव्हा लोचने तृप्त होतात. कलेकलेने चंद्राचे वाढते रूप नेत्रदीपक वैभव आपल्याला भौगोलिक सत्य आणि खऱ्या जगाचा विसर पाडण्यास भाग पाडते. या रात्री सौंदर्याचा महापूर ओसंडत असतो हा चांदवा आपल्या ओंजळीत घेण्यासाठी या रात्री जागरण केले जाते. दूध आटवले जाते. केशर दुधात चांदवा पडल्यानंतर त्याची शितलता आणि गोडवा द्विगणित होतो.

कोजागरी पौर्णिमेची एक पौराणिक कथा देखील सांगितली जाते असे, म्हणतात कोजागरीला रात्री बारा वाजता जेव्हा आकाशात चंद्राने सोनरंग धारण केलेला असेल तेव्हा लक्ष्मी घराबाहेर पडते. या रात्री ज्या घराचे दारे उघडे असेल तेथे ती आपले वैभव वाटते कोण जागती कोण जागती हे पाहत लक्ष्मी या पौर्णिमेला आपल्या घरी येत असते. म्हणून या पौर्णिमेला कोजागरी असे म्हणतात कोजागरीचा चंद्र पाहून कोणी यावर भुलणार नाही, असा रसिक या धरेवर तरी भेटणार नाही. निळ्याशार सागराच्या कुशीत बिलगणारे चांदणे पाहून कवी बा.भ.बोरकर म्हणतात, "माझ्या गोव्याच्या भूमीत सागरात खेळे चांदी." या धवल चांदण्याला चांदीची उपमा देऊन किती मोहक काव्य त्यांनी रचले आहे. असे मोहक शरदाचे चांदणे पाहण्यासाठी लोक उत्सुक असतात. हे चांदणे डोळ्यांनी टिपता टिकता अगदी अलवारपणे दुग्धपान केले जाते. याच दिवशी लक्ष्मीची उपासना केली जाते. शुभ्र वस्त्र धारण करून ऐरावतावर बसलेल्या इंद्राची पूजाही केली जाते. दीपप्रज्वलित करून कौमुदी पूजा केली जाते. लक्ष्मी आणि कुबेराचे प्रतिक म्हणून जी सुपारी पूजेला ठेवली जाते तिच सुपारी लक्ष्मीपूजनाच्यावेळी पूजेसाठी घेतली जाते. काही पुराणकथा या दिवसाचे पवित्र आणि वेगळे महत्त्व सांगतात. शरद पौर्णिमेला माता लक्ष्मीचा जन्मदिवस मानला जातो. समुद्रमंथनातून प्रकट झालेल्या माता लक्ष्मीचा जन्मोत्सव हा कोजागरीला केला जातो. सोळा कलांनी संपूर्ण होणारा चंद्र या दिवशी आपल्या अगदी नजदीक असल्याने नेत्र स्पर्श त्याला होतो असे भासते. त्यांची सुखकर किरणे मनाला शांती प्रदान करत असतात. चंद्राची किरणे ही विशेष अमृतमणी गुणांनी परिपूर्ण असल्यामुळे ती आपल्यावर संपूर्ण चंद्राची किरणे त्यात पडू देतात आणि मग ते दूध प्राक्षण केले जाते. असे केल्याने एक उत्तम आरोग्य आपल्याला प्रदान होते असाही उल्लेख शास्त्रात आढळतो. विविध ही कोजागरी सजली आहे. अनेक पुराण कथातून हिचे महत्त्व आपल्यासमोर आले आहे त्यातून ही पौर्णिमा स्वतः पवित्र आहे. तिला नवप्रकाश प्रेरणा प्रदान करणारी म्हणून



पवित्र प्रभाव टाकतात. कौमुदी उत्साह आणि राधाकृष्ण स्मरण होणार नाही हे अशक्य द्वापार युगात भगवान श्रीकृष्णाने आपल्या प्रिय राधेसाठी तिच्या समवेत गोपिकासवे महारासलिला गेली होती. या विशिष्ट प्रसंगाची आठवण ही कोजागरी आपल्याला करून देते. हीच आठवण म्हणून बऱ्याच ठिकाणी स्वर संगीत मैफिली भरवल्या जातात व ही कोजागरी स्वरमयी संगीतमय साजरी करतात. या उत्सवाची गोडी आणि आनंद ही कोजागरी आपल्याला देवू करत असते. शब्दावीण ही चांदण्याची चमचमता मनाच्या तारांमधून हळुवार हुंकारत राहते. चांदव्याची ऊब आणि वाऱ्याची निर्झर बासरी अगदी अलवारपणे वाजत राहते. दुधात सुकामेवा, साखर, केशर, जायफळ घालून प्रांतानुसार ती वेगवेगळ्या पद्धतीने साजरी केली जाते. कोणी संगीत मैफिली भरवून, काही प्रांतात नृत्य करून, तर काही प्रांतात उपासना करून साजरी केली जाते. अनेक रूपाने परिपूर्ण ही कोजागरी ही आपल्याला सुखाचा चांदवा देत असते. कोजागरीनंतर दिपावलीच्या पर्वाची सुरूवात होत असते. गर्द अंधाराला दूर सारून प्रकाशमय होण्याचे शौर्य ही पौर्णिमा आपल्याला देत असते. अशी ही न्यारी पौर्णिमा आपल्यासाठी सुख पेरणारी असते त्यामुळे ती इतर पौर्णिमेच्या तुलनेत अधिक प्रिय असते हेच खरं!

तनामनाला सुगवून जाणारी शितलता कोठूनही लाभणे अशक्य आहे. त्यामुळेच चांदव्याचे हे सुख लुटणे सर्वस्वी आपल्या हाती असते.अनेक कविच्या काव्यातून देखील ओळखले जाते. निसर्गाकडे फार मोठे सौंदर्य रहस्य आहेत. ते आपल्याला असे सहज उलगडता येणे शक्य नाही पण ते आपल्याला कळतात ते या सणांच्या आणि उत्सवाच्या रेलचेलीतून. प्रत्येक सणांचे एक वेगळे महत्त्व आहे आणि त्याच बरोबर या निसर्गातील तसेच या सुर्यमालेतील प्रत्येक घटकाला एक निराळे महत्त्व आहे. हे उत्सव आपल्याला नकळत त्याच्या जवळ घेऊन जात असतात. नाहीतर कोणीही विनाकारण कधीच अवकाशातला चंद्र न्याहाळेल. नव प्रेम युगत फक्त या चंद्र वर्णनात भुललेले असतात. परंतु आपल्यालाही हे सौंदर्य पाहण्याचा कधी न कधी मोह जडतोच तो मोह पूर्ण करण्यासाठी खरंतर ही कोजागरीची रात्र सजत असते.

## शरीफ यांची घरवापसी

आधुनिक केसरी



श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र.: ९९२२५४६२९५

**पाकिस्तानचे माजी पंतप्रधान नवाझ शरीफ यांची घरवापासी झाली आहे. गेली अनेक वर्ष ते पाकिस्तानमधून परागंदा होऊन लंडनमध्ये जाऊन बसलेले नवाझ शरीफ पुन्हा पाकिस्तानमध्ये परतले आहेत. पाकिस्तानची ही परंपराच आहे, ज्यावेळी पंतप्रधान पद जाते त्यावेळी तेथील पंतप्रधानांना एकतर देश सोडून पळून जावे लागते किंवा जेलमध्ये जावे लागते काही पंतप्रधान तर थेट ढगात गेल्याचाही पाकिस्तानचा इतिहास आहे. नवाझ शरीफ यांचा मागील निवडणुकीत पराभव झाला तेंव्हा त्यांच्यावर भ्रष्टाचाराचे आरोप करण्यात आले होते. नवाझ शरीफ यांचा पराभव केल्यावर इम्रान खान पंतप्रधान बनले आणि त्यांनी नवाझ शरीफ यांचा भ्रष्टाचार उकरून काढून त्यांना जेलमध्ये टाकण्याचा इशारा दिला.**

इम्रान खान पंतप्रधान झाल्यावर नवाझ शरीफ यांची तुरुंग वारी निश्चित झाली होती मात्र जेलमध्ये जाण्याआधीच नवाझ शरीफ लंडनला पोहचले. आता पुलावरून पाणी वाहून गेले आहे. पाकिस्तानमधील परिस्थिती आता बदलली आहे. इम्रान खान यांचे पंतप्रधान पद गेले आहे. जे इम्रान खान नवाझ शरीफ यांना जेलमध्ये टाकणार होते तेच इम्रान खान आता भ्रष्टाचाराच्या आरोपाखाली जेलमध्ये गेले आहेत. परंपरेप्रमाणे इम्रान खान यांचे पंत्रधानपद गेले आणि त्यांची रवानगी तुरुंगात झाली. नवाझ शरीफ यांचे बंधू शहाबाज शरीफ हे पंतप्रधान बनले. इम्रान खान यांना पदावरून हटवण्यात लष्कराचा मोठा वाटा होता. इम्रान यांनी लष्कराच्या कलेने राज्य कारभार केला नाही त्याची शिक्षा त्यांना लष्कराने दिली. पाकिस्तानात कोणीही पंतप्रधान होवो त्याला लष्कराच्या कलेनेच कारभार करावा लागतो तो जर त्यांनी केला नाही तर लष्कर त्यांना पदच्युत करून आपल्या पसंतीच्या व्यक्तीला खुर्चीवर बसवतो. शहाबाज शरीफ यांना देखील लष्करानेच खुर्ची दिली मात्र त्यांना ती सांभाळता आली नाही. पाकिस्तानात त्यांच्याविषयी प्रचंड नाराजी आहे. महागाई गगनाला भिडली आहे.

लोकांना जगणे मुश्कील झाली आहे. बलुचिस्तान सारख्या भागातून उठाव होत आहे. जनता रस्त्यावर उतरत आहेत. तालिबानचा त्रास वाढला आहे एकूणच पाकिस्तानात अराजकता माजली आहे. पाकिस्तानला या अराजकतेतून बाहेर काढण्यासाठी नवाझ शरीफ सारख्या अनुभवी व्यक्तीची गरज आल्याने तसेच शहाबाज शरीफ यांच्या नेतृत्वाखाली पुन्हा सत्ता येणे अवघड आहे हे पाकिस्तान पीपल पार्टीच्या लक्षात आले आहे त्यामुळेच नवाझ शरीफ यांची घरवापसी झाली आहे. नवाझ शरीफ यांची घरवापसिकडे भारताचेही बारीक लक्ष आहे कारण कदाचित तेच पाकिस्तानचे आगामी पंतप्रधान



असतील अर्थात याआधी ते तीनदा पाकिस्तानचे पंतप्रधान होते यावेळी त्यांनी भारताशी मैत्री करण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला हे मान्यच करावे लागेल. अटल बिहारी वाजपेयी पंतप्रधान असताना दिल्ली लाहोर बससेवा सुरू करण्यात त्यांनीच पुढाकार घेतला होता. २०१४ साली मोदी पंतप्रधान बनले तेंव्हा त्यांच्या शपथविधीला त्यांनी सर्वांचा विरोध झुगारून हजेरी लावली होती. मोदींनीही लाहोरला जाऊन त्यांची भेट घेतली होती ते भारताशी मैत्री करू इच्छितात हे त्यावेळच्या लष्करप्रमुखांना पसंत नव्हते म्हणूनच त्यावेळचे लष्करप्रमुख जनरल परवेझ मुशर्रफ यांनी कारगिल युद्ध घडवून आणले. लष्कराच्या विरुद्ध जाऊन नवाझ शरीफ यांनी कारगिल युद्ध थांबवण्यास सहमती दिल्याने जनरल मुशर्रफ यांनी त्यांना पदच्युत करून स्वतः पाकिस्तानचे प्रमुख बनले. तेंव्हाही नवाझ शरीफ यांना लंडनमध्ये लपून बसावे लागले. जर तेंव्हा नवाझ शरीफ यांनी पाकिस्तान सोडले नसते तर नवाझ शरीफ यांना देहांताची शिक्षा देण्याची तयारी मुशर्रफ यांनी केली होती अशी चर्चा तेंव्हा पाकिस्तानात होती. अनेक वर्षांनी आता ते पुन्हा पाकिस्तानात परत आले आहेत. त्यांच्या घरवापसीचे भारतानेही स्वागतच केले आहे. मोदी आणि नवाझ शरीफ यांची मैत्री जगजाहीर आहे ते जर पुन्हा पंतप्रधान बनले तर भारत पाकिस्तानचे कटू संबंध सुधरायला मदतच होईल मात्र भारताशी मैत्रीचे संबंध स्थापित करताना त्यांना लष्कराशिही जमवून घ्यावे लागेल अन्यथा पुन्हा इतिहासाची पुनरावृत्ती होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार राज्यभरातील सर्व शाळांचे मूल्यांकन

## शाळासिद्धीच्या धर्तीवर शाळा गुणवत्ता मूल्यांकनाचा आराखडा : नोव्हेंबरअखेर होईल आराखडा पूर्ण

आधुनिक केसरी न्यूज

**डॉ. जगदीश पाटील**

**भुसावळ :** राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाला अनुसरून शाळांचे मूल्यांकन करण्यासाठी प्रत्येक राज्याने शाळा गुणवत्ता मूल्यांकनाचा आराखडा तयार करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. त्यानुसार महाराष्ट्र राज्यातील शाळांचे मूल्यांकन करण्यासाठी निकष निर्मितीचा आराखडा तयार करण्याचे काम महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद पुणे यांच्यातर्फे करण्यात येत आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाला अनुसरून SQAAF म्हणजेच स्कूल क्वॉलिटी एशुरन्स ॲण्ड ॲक्रिडेशन फ्रेमवर्क तयार केला जात आहे. त्यासाठी राज्यभरातील तज्ज्ञांची निवड करण्यात आली आहे. यासंदर्भात आतापर्यंत दोन कार्यशाळा पार पडल्या असून तिसरी कार्यशाळा दि. 27 ते 28 ऑक्टोबर दरम्यान पार पडत आहे. नोव्हेंबरअखेर हे काम पूर्ण होणार असून आराखड्याची चाचपणी करण्यासाठी पायलट प्रोजेक्टही राबविण्यात येणार आहे. राज्यस्तरीय दुसऱ्या कार्यशाळेत एससीईआरटीचे संचालक डॉ. अमोल येडगे यांच्या मार्गदर्शनाखाली उपसंचालक डॉ. कमलादेवी आवटे, संकीर्ण विभाग प्रमुख तथा SQAAF चे राज्य प्रमुख राजेंद्र वाकडे, शिक्षणतज्ज्ञ माजी प्राचार्य डॉ. ह. ना. जगताप, विद्या समीक्षा केंद्राचे राज्य समन्वयक असिफ शेख यांच्या मार्गदर्शनाखाली सदर कार्यशाळा पार पडत आहेत. मान्यवरांनी SQAAF विषयी मार्गदर्शन केले. त्यानंतर राज्यभरातील विविध तज्ज्ञांचे गट तयार करून गटनिहाय कामकाज व सादरीकरण तसेच निकष निर्मिती आराखड्यावर काम करण्यात येत आहे. महाराष्ट्र राज्यातील शाळांचे मूल्यांकन करण्यासाठी यापूर्वी माझी समृद्ध शाळा व शाळा ग्रेडेशन यासारख्या शाळा मूल्यांकन कार्यक्रमांची अंमलबजावणी केली जात होती. त्यानंतर शाळा मानके व मूल्यांकनाचा एक राष्ट्रीय कार्यक्रम तयार करण्यात येऊन त्यानुसार शाळासिद्धी मूल्यांकनाचा कार्यक्रम सुरू केला. दरम्यान 2020 मध्ये राष्ट्रीय शैक्षणिक धोरण जाहीर झाले. या धोरणात शाळा मूल्यांकनाबाबत सविस्तर सूचना देण्यात आल्या आहेत. धोरणातील शालेय शिक्षणात मुद्दा क्रमांक आठमध्ये शालेय शिक्षणासाठी मानके ठरवणे आणि अधिस्विकृती यासंदर्भात माहिती देण्यात आली आहे. त्यातील पाचव्या उपमुद्यात राज्य शालेय शिक्षण व्यवस्थेसंदर्भात राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची मुख्य तत्त्वे आणि शिफारसी या व्यवस्थेतील स्वतंत्र जबाबदाऱ्या आणि त्यांच्या नियमानाबाबत दृष्टिकोन देण्यात आला आहे. त्यात राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद नवी दिल्ली (NCERT) आणि प्रत्येक राज्यातील राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (SCERT) या दोन्ही संस्थांवर जबाबदारी निश्चित करण्यात आली आहे. त्यानुसार राज्यातील शैक्षणिक मानके आणि अभ्यासक्रमांसह शैक्षणिक बाबींचे संचालन एनसीईआरटीच्या सल्ला व सहकार्याने प्रत्येक राज्यातील एससीईआरटी करेल. तसेच एससीईआरटी सर्व संबंधितांशी चर्चा करून शालेय गुणवत्ता मूल्यांकन आणि अधिस्वीकृती फ्रेमवर्क विकसित करेल असे राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात नमूद करण्यात आले आहे. त्यानुसार महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद पुणे यांच्यातर्फे शाळा गुणवत्ता मूल्यांकन आराखडा निर्मिती करण्यासाठी पुढाकार घेण्यात आला आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 च्या अंमलबजावणीसाठीचा असलेला सार्थक प्लॅन मधील टास्क क्रमांक 215 नुसार SQAAF म्हणजेच स्कूल क्वॉलिटी एशुरन्स ॲण्ड ॲक्रिडेशन फ्रेमवर्कची निर्मिती करण्यात येणार आहे.



राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार सर्व शाळांचे मूल्यांकन करण्यासाठी मार्गदर्शक आराखडा विकसित केला जाणार आहे. त्यासाठी एक सर्वसमावेशक दृष्टीकोन हाती घेण्यात आला आहे. हा दृष्टिकोन तीन भागांमध्ये विभागलेला आहे. त्यातील पहिल्या भागात सैद्धांतिक पैलू मांडण्यात येणार असून दुसऱ्या भागात निकषांची पूर्तता करण्यासाठी शाळा राबवू शकतील अशा सूचक कृती कार्यक्रमात्मक आणि आर्थिक मानदंड यांचा समावेश आहे. तिसरा भाग शालेय गुणवत्ता मूल्यांकन आराखडा (SQAF) असून त्यात क्षेत्रनिहाय गाभामानकांचा समावेश राहिल.
**– असिफ शेख, राज्य प्रमुख (विद्या समीक्षा केंद्र, महाराष्ट्र)**

शाळा आणि शिक्षकांना विश्वासाने सक्षम करून त्यांना उत्कृष्टतेसाठी धडपडण्यास सक्षम करणे आणि त्यांच्या उत्कृष्ट कामगिरीची खात्री करून घेणे यासाठी एक प्रभावी गुणवत्ता स्वयं–नियमन शिक्षणाच्या सर्व टप्प्यांसाठी मान्यता प्रणाली स्थापित करण्याचे काम शाळा गुणवत्ता मूल्यांकनाद्वारे केले जाईल. गुणवत्ता मानके ठरवून शालेय मूल्यमापन प्रणाली वस्तुनिष्ठ करण्याचे काम SQAAF च्या माध्यमातून होवून शाळेच्या भविष्यातील विकासासाठी योजनाही तयार होऊ शकतील.**– राजेंद्र वाकडे, (संकीर्ण विभाग प्रमुख SCERT तथा राज्य प्रमुख, SQAAF)**

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 मध्ये पूर्व प्राथमिक ते उच्च माध्यमिकमधील शिक्षणाच्या सर्व टप्प्यांसाठी, सर्व शाळांसाठी खाजगी तसेच शासकीय शाळांचे मूल्यांकन करण्यासाठी व मानांकन ठरविण्यासाठी आवश्यक गुणवत्ता मानके सुनिश्चित केली जातील असे म्हटले आहे. त्यानुसार मानके तयार करण्यासाठी एससीईआरटी येथे वर्षभरामध्ये विविध कार्यशाळा होणार आहेत. त्यासाठी मूल्यांकनाचे ज्ञान व अनुभव असणाऱ्या तसेच शाळासिद्धीची माहिती असणाऱ्या राज्यभरातील तज्ज्ञांची निवड करण्यात आली आहे. या तज्ज्ञांची तीसरी कार्यशाळा महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद तथा एससीईआरटी पुणे येथे दि. 27 ऑक्टोबर ते 28 ऑक्टोबर 2023 दरम्यान पार पडत आहे. नोव्हेंबरअखेर कार्यशाळा होणार असून त्यानंतर पायलट प्रोजेक्ट राबविण्यात येणार आहे.

जळगाव जिल्ह्यातील पाच तज्ज्ञांचा समावेश - शाळा गुणवत्ता मूल्यांकन व हमी आराखडा निर्मिती कार्यशाळेत जळगाव जिल्ह्यातील पाच तज्ज्ञांची निवड करण्यात आली आहे. त्यात जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेतील अधिव्याख्याता डॉ. चंद्रकांत साळुंखे (जळगाव), शाळासिद्धीचे जिल्हा समन्वयक डॉ. जगदीश पाटील (भुसावळ), डी. के. पाटील (रावेर), श्यामकांत रूले (मुक्ताईनगर), डॉ. अर्चना विसावे (पारोळा) अशा पाच तज्ज्ञांचा समावेश आहे.

## ग्रामीण भागाच्या मूलभूत सोई सुविधांसाठी 5 कोटी रुपये निधी मंजूर

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** ग्रामीण क्षेत्राचा विकास झाला तरच जिल्ह्याचा, राज्याचा आणि देशाचा विकास होऊ शकतो, असा ठाम विश्वास बाळगणारे राज्याचे वने, सांस्कृतिक कार्य, मत्स्यव्यवसाय मंत्री तथा चंद्रपूर जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार ग्रामीण भागात मुलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी सदैव आग्रही असतात. त्यानुसार त्यांनी ग्रामीण भागाच्या विकासासाठी अनेक क्रांतीकारी निर्णय घेतले आहेत. ना. श्री. मुनगंटीवार यांच्या पुढाकारातून ग्रामीण क्षेत्रातील विकासकामांसाठी 5 कोटी रुपये मंजूर झाल्यामुळे त्याची पुन्हा एकदा प्रचिती आली आहे.


गावांतर्गत मुलभूत सुविधांच्या कामासाठी निधी उपलब्ध करून देण्याबाबत लोकप्रतिनिधींकडून निधीचे प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यात येतात. यात जिल्ह्याचे पालकमंत्री श्री. सुधीर मुनगंटीवार यांच्या पुढाकारातून ग्रामीण भागात मुलभूत सुविधांसाठी 5 कोटी रुपये मंजूर झाले आहे. याबाबतचा शासन निर्णय जारी करण्यात आला आहे. यात बल्लारपूर तालुक्यातील विविध गावांसाठी 1 कोटी रुपये, चंद्रपूर तालुक्यातील गावांसाठी 1 कोटी 60 लक्ष रुपये, मूल तालुक्यासाठी 1 कोटी 15 लक्ष रुपये, पोंभुर्णा तालुक्यासाठी 1 कोटी 15 लक्ष रुपये तर गोंडपिपरी तालुक्यातील चेक लिखितवाडा येथे स्मशनभुमीचे शेड बांधकाम व तारेचे कुंपण करण्यासाठी 10 लक्ष रुपये असे एकूण 5 कोटी रुपये मुलभूत सुविधा पुरविण्याकरीता मंजूर झाले आहेत.

या निधीमधून चंद्रपूर तालुक्यातील लोहारा येथे 50 लक्ष रुपयांत गोलकर समाजाकरिता सामाजिक सभागृहाचे बांधकाम करणे, बल्लारपूर तालुक्यातील बामणी येथील शिक्षक कॉलनीच्या ओपन स्पेसमध्ये लोखंडी शेड, संरक्षण भिंत आणि वॉकिंग ट्रॅक (30 लक्ष रुपये), मानोरा (ता. बल्लारपूर) येथे नवीन ग्रामपंचायत भवनाचे बांधकाम (30 लक्ष रुपये), मूल तालुक्यातील येरगाव येथे कुणबी समाजाकरीता सामाजिक सभागृह बांधकाम करणे (30 लक्ष रुपये), मूल तालुक्यातील बोरचांदली येथे केवट समाजाकरीता सामाजिक सभागृहाचे बांधकाम (30 लक्ष रुपये) याशिवाय विविध गावांत सिमेंट रस्त्याचे बांधकाम, रस्त्याचे खडीकरण, चौकाचे सौंदर्यीकरण, पाणंद रस्त्याचे बांधकाम, स्मशान भुमीकरीता रस्ता तयार करणे, नालीचे बांधकाम आदी मुलभूत कामे करण्यात येणार आहे. गावाच्या विकासासाठी 5 कोटी रुपये उपलब्ध करून दिल्याबद्दल गावकऱ्यांकडून ना. सुधीर मुनगंटीवार यांचे आभार मानले जात आहे.




महाराष्ट्र Business Katta









# हाताने मैला साफ करण्याच्या प्रथेचे उच्चाटन व्हावे



डॉ. सुधीर अग्रवाल
संपर्क क्र. 9561594306

आधुनिक केसरी

**भारताला स्वातंत्र्य मिळून ७५ वर्षे लोटली तरी भारतात अजूनहीहाताने मैला साफ करण्याची प्रथा देशातील काही भागात सुरू आहे. गटार व नाल्यांमधून घान साफ करताना अनेकांचा मृत्यू होत असतो. ही अमानवीय व वेठबिगार निर्माण करणारी प्रथा असून मूलभूत अधिकाराचे उल्लंघन करणारी आहे.गेल्या कित्येक वर्षापासून एक विशिष्ट समाज डोक्यावरून मैला वाहून नेत आहे. यांत्रिककरणाच्या युगातही राज्यातील काही भागांत आजही सफाई कामगार हाताने मैला उचलत आहेत. त्यांचेच हे काम आहे ही समजूत आपण करून घेतली आहे.**

एवढेच नव्हे तर ही माणसं डोक्यावरून मैला वाहून नेत असताना नाकाला पदर लावणारे आम्ही त्यांच्या नरक यातना कधीच समजून घेवू शकलोच नाहीं. ही कूप्रथा राज्यातून समूळ नष्ट करण्याची गरज आहे.हाताने मैला  वाहून नेण्यासाठी रोजगार प्रतिबंधक आणि त्याचे पुनर्वसन कायदा करण्यात आला असला तरी त्याची प्रभावीपणे अंमलबजावणी होत नसल्याचे ही कुप्रथा अनेक भागात सुरूच असून यात अनेकांचा जीव गेलेला आहे. देशात गेल्या पाच वर्षात ३४७ जणांचा झाले आणि सेफ्टी टॅंक स्वच्छ करताना मृत्यू झाला यापैकी ४०% मृत्यू दिल्ली तामिळनाडू आणि उत्तर प्रदेशातील आहेत त्यांच्या वारसांना नुकसान भरपाई मिळालेली नाही. याप्रकरणी सुप्रीम कोर्टाने संताप व्यक्त केला. जनहित याचिकेवर निर्णय देताना सर्वोच्च न्यायालयाने गटार साफ करताना कर्मचाऱ्यांचा मृत्यू झाल्यास कुटुंबीयांना तीस लाखाची भरपाई देण्यात यावी असे निर्देश केंद्र राज्यांना दिले आहेत. सांगितले की नाल्यांची सफाई करताना जीव गमावणाऱ्यांच्या कुटुंबीयांना तीस लाख रुपये कायमची दिव्यांग झालेले न किमान २०लाख रुपये



आणि आजारी पडलेल्यांना दहा लाख रुपयाची भरपाई देण्यात यावी तसेच हाताने घाण वाहून येण्याची प्रथा संपुष्टात यावी म्हणून सरकारने त्यावर बंदी घालून २०१३ पुनरवसन अधिनियमा अंतर्गत त्यांच्या पुनर्वसनाचे काम केले पाहिजे,असे निर्देश न्यायालयाने दिले. 'आमची लढाई, सत्ता, संपत्तीसाठी नाही. ती स्वातंत्र्याची लढाई आहे ही मानवी व्यक्तिमत्त्वाच्या पुनरुत्थानाची लढाई आहे.' हे घटनाकार डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचे वक्तव्य उद्घृत करीत न्यायमूर्ती एस रविंद्र भट न्यायमूर्ती अरविंद कुमार यांच्या जनहित याचिकेवर निकाल दिला.मॅन्युअल स्कॅवेंजिंगला प्रतिबंध घालण्यासाठी शासनाने दोन प्रमुख कायदे केले. एक १९९३ साली तर दुसरा २०१३ साली करण्यात आला.१९९३च्या कायद्यान्वये मॅन्युअल स्कॅवेंजिंगला बंदी घातली गेली. तर २०१३ च्या कायद्यान्वये असे काम करवून घेणाऱ्यास शिक्षेची आणि पीडित कुटुंबाच्या पुनर्वसनाची तरतूद करण्यात आली. मात्र, या अमानवीय कामाचे जे मूळ कारण आहे. मागासलेल्या जातींबद्दलचा भेदभावपणा आणि जातीनुसार बळजबरीने काम करवून घेण्याची पद्धत हे कुठेही या कायद्यांत दिसत नाही.

२०१३च्या कायद्याअंतर्गत प्रत्येक गुन्हा हा दखलपात्र व अजामीनपात्र करण्यात आला व याची कार्यवाही करण्याचे न्यायालयाचे अधिकार कार्यकारी दंडाधिकाऱ्यास दिले. परिणामी प्रशासनातील व्यक्तीलाच हे अधिकार दिल्याने कायद्याच्या कमी ज्ञानामुळे या गुह्यांत आरोपीस दोषी ठरवण्याचा दर नगण्य आहे. जर एखाद्या ठिकाणी गुन्हा घडला तर तेथील स्थानिक पोलिस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्याचे प्रमाणही कमी आहे.इतरवेळी सामान्यतः खुनाचा गुन्हा घडला तर शासन त्याची फिर्याद देते. मात्र, येथे या गुन्ह्यांत असे होत नाही. गुन्हा दाखल केला तरी योग्य कायदे लावले जात नाही. केवळ कलम ३०४-अ (भादंवि) गुन्हा दाखल केला जातो. मॅन्युअल स्कॅवेंजिंगचे गुन्हे घडले तर त्यात २०१३च्या कायदा व अ‍ॅट्रॉसिटी कायदा याअंतर्गत गुन्हे दाखल करायला पाहिजे पण असे होत नाही, जे मुंबई उच्च न्यायालयानेही अधोरेखित केले आहे व पुढे यावर सुनावणी करणार आहे.

कायद्याने हाताने मैला साफ करण्याला जरी बंदी असली तरी ठेकेदार किंवा कंपन्या हे काम करायला भाग पाडतात. यासाठी केवळ याचे गुन्हेगारीकरण करून हे कमी होणार नाही तर यासाठी हे काम फक्त यंत्रांच्याद्वारेच करण्यावर शासनाला भर द्यावा लागेल. २०१३ कायद्यात कलम ३३ ही तरतूदही यासाठी आहे. परंतु यामध्ये स्पष्टता नाही. त्यामुळे या कामाचे पूर्ण यांत्रिकीकरण करण्यास कायद्यात सुधारणा आवश्यक आहेत. तंत्रज्ञान, आधुनिकीकरण आणि यांत्रिकीकरण यांची सांगड घालून मार्ग काढावा लागेल.

# सुसंगती सदा घडो, परंतु...



बबन गुळवे
मुंबई. मो.९७३०९३९७३२

आधुनिक केसरी

**सुसंस्कृत, चारित्र्यवान, कष्टाळू आणि निर्व्यसनी लोकांची संगत लाभली की त्या व्यक्तीचे जीवन नक्कीच चांगला आकार घेते आणि ज्या व्यक्तीला वाईटांची संगत लाभते तो तसाच वाईट सवयींचा गुलाम बनत जातो. बालवयात, शालेय जीवनात आणि कॉलेज लाईफ मध्ये चांगले मित्र मिळाले की जीवनाचे सोने व्हायला वेळ लागत नाही.**

जर त्या तिन्ही वयात कोणी वाईट मित्रांच्या संगतीच्या आहारी गेला की त्याच्या जीवनाचे संतुलन बिघडते.त्याला व्यसनांची तलफ लागते,चारित्र्य बिघडते आणि वर्तनात घाणेरडेपणा येतो.म्हणून म्हटले जाते की संगत चांगली असावी. आणी चांगल्या संगतीचे महत्त्व सांगताना'सुसंगती सदा घडो सुजन वाक्य कानी पडो' हे सुभाषित सांगितले जाते. एखादा व्यक्ती ज्या लोकांच्या संगतीत राहतो त्यावरुन त्याची ओळख ठरत असते. जो चांगल्या लोकांसोबत राहतो तो चांगला आणि जो वाईटांच्या संगतीत राहतो तो वाईट हा सहसंबंध ठरलेला आहे. म्हणून प्रत्येक व्यक्तीने आपली स्वतःची ओळख कोणती ते शोधले पाहिजे. म्हणजे तुम्हाला कोणी चांगले म्हणत असेल तर तुमची संगत चांगली हे साधे तंत्र आहे. आणखी एक महत्त्वाची बाब म्हणजे आपल्यावर घरातूनच सुसंस्कार झाले की आपण सुसंस्कृत बनतो. वाईट लोकांचा प्रभाव आपल्यावर कदापि पडत नाही. मला  माझी आजी पार्वतीबाई,माझी आई कौसल्याबाई आणि वडील दामोदर गुळवे यांचे संस्कार लाभले. माझे वडील निर्व्यसनी होते आणि आज आम्ही भाऊ निर्व्यसनी आहोत. आमच्या गावातील विचारवंत व स्वातंत्र्यसेनानी कालिदासराव देशपांडे यांनी मला पुस्तके वाचण्याचा संस्कार दिला, आमचे विज्ञान विषयाचे आदर्श शिक्षक गणेशराव गुळवे गुरुजी यांनी चारित्र्य व नितीमत्ता शिकवली व वैज्ञानिक दृष्टिकोन रुजवला. माझे बंधू प्रा.राजेंद्र गुळवे यांनी कर्तव्याचे आणि कष्टाचे संस्कार शिकवले. माझे शालेय जीवनातील मित्र संजय अर्थमवार, प्रमोद भोगिल, संभाजी गरड,उल्हास लोखंडे,मारोती चेबळे यांची सुसंगत लाभली. कॉलेजच्या जीवनात युवराज चव्हाण,मंगेश देशपांडे, धनंजय पाटील, विरेंद्र उळागड्डे आणि प्रा. डॉ.शिवशंकर मिटकरी हे सुहृदयी मित्र मिळाले.



आणि शिक्षण क्षेत्रात नोकरी करताना हणमंत कमलापुरे, कार्तिक घाटीवाले, विश्वनाथ विळेगावे, रामराव चव्हाण या ज्येष्ठ सहकारी शिक्षकांनी माझ्या मनात कर्तव्य परायनता आणि शिक्षकी पेशाशी एकनिष्ठ राहण्याची दक्षता रुजवली. माझे मित्र एकनाथ पलमटे, दत्तात्रय मोहिते, माधवराव वाघमारे, शिवाजी नामपल्ले, मारोती रुद्रावाड, उत्तम घोडके, अंकुश आढे, संजय पालकुर्तावार, बालाजी नाईक आणि विलास आगलावे हे वेळोवेळी माझ्या मदतीला धावून येतात. या सगळ्यांची आणि माझी सुसंगत लाभली आहे. सांगायचा मुद्दा असा आहे की सुसंगती लाभली की माणूस चांगले जीवन जगत असतो. चांगले वागतो, चांगले बोलतो, चांगले ऐकतो आणि चांगले कर्म करतो.परंतु वाईटांच्या कुसंगतीत मात्र व्यक्ती वाहत जातो.चांगले व वाईट यातील फरक त्याला कळत नाही.म्हणून जीवनात नेहमी सुसंगती ठेवा, चांगले जीवन जगा. आपोआप आनंदाचे क्षण वाट्याला येतात. जीवन कृतार्थ झाल्याचे समाधान मिळते. माझ्या सुदैवाने मला नेहमी चांगले मित्र मिळत गेले, आदर्श शिक्षकांची संगत लाभली आणि चांगल्या व दर्जेदार पुस्तकांचाही सहवास लाभला. त्यामुळे शिक्षकी पेशात मी आनंदी व समाधानी आहे. माझे अनेक विद्यार्थी वेगवेगळ्या क्षेत्रात कार्यरत आहेत. सुसंगतीत राहून चांगले कार्य करत आहेत.असे अनेक विद्यार्थी घडवायचे आहेत, त्यांच्यामध्ये सुसंस्कार रुजवायचे आहेत.

# मराठवाड्यावर दुष्काळाचे सावट



बुद्धभूषण चं. कांबळे
संपर्क क्र. 7498715661

आधुनिक केसरी

**यावर्षी मराठवाड्यातील शेतकरी शेतात पेरणी करून बसले खरे पण नुकताच पावसाने मराठवाड्यातून काढता पाय घेतल्याने शेतकरी हवालदील झाले आहेत. काही शेतकरी दादांना दूबार पेरणी करावी लागली होती.थोडाफार पाऊस पडल्याने पेरणी केली खरी पण पावसाने मात्र गूलचीच दिली. पाऊस म्हणावा तसा पडलाच नाही. शेतात पेरलेला कापूस,सोयाबीन व ज्वारी पाण्याविना करपून गेली आहे. तलाव,नद्या व विहीरी तुडूंब भरलेल्या नसल्यामूळे यंदा शेतकरी दादांना रब्बी पिके घेता येणार नाहीत.**

आणि आता लागलीच दिवाळी जवळ आली आहे. शेतकरी तर मेटाकूटीला आले आहेत. त्यांना अर्थिक चणचण भासत आहे. सांगायचा मूद्दा काय तर यंदा शेतकरी व  शेतमजूर दुःखात आहेत. त्यांची दिवाळी गोड व्हावी यासाठी राज्य शासनाने दुष्काळ जाहीर करुन शेतकऱ्यांना अर्थिक मदत करावी. नाहीतर शेतकरी आत्महत्येचे प्रमाण वाढत जाणार आहे. शेतकरी कर्जबाजारी होणार आहेत. राज्यशासन व केंद्रशासन मूग गिळून गप्प बसले आहेत. शेतकऱ्यांचे मात्र हाल हाल होत आहेत. शेतकरी हा जगाचा पोशिंदा आहे, असे आपण मोठेपणाने म्हणतो आणि त्यांच्यावर बिकट परिस्थिती आल्यावर मात्र त्यांच्याकडे दुर्लक्ष करतो. म्हणून जाता जाता मायबाप सरकारला कळकळीची विनंती करतो की,आपण यंदा शेतकऱ्यांना होता होईल तेवढी काहीतरी अर्थिक मदत करुन त्यांना मानसिक आधार व धीर द्यावा. कारण शेतकरी जगला तरच हे जग टिकेल. यंदा पाऊस उशिरा दाखल झाला. त्यातच राज्यात यंदा अपेक्षित पाऊस झाला नसल्याने अनेक भागात दुष्काळ सदृश्य परिस्थिती आहे. त्यामुळे राज्यातील 13 जिल्ह्यांवर दुष्काळाचं सावट असून, काही जिल्हे तर थेट रेड झोनमध्ये असल्याची माहिती हवामान विभागाने दिली आहे. त्यामुळे चिंता आणखी वाढली असून, राज्यात जोरदार पावसाची गरज आहे. विशेष म्हणजे मराठवाड्यात काही जिल्ह्यांमध्ये परिस्थिती गंभीर होताना दिसत आहे. राज्यात पावसाने दडी मारल्याने परिस्थिती अधिकच गंभीर होत चालली आहे. राज्यातील 36 जिल्ह्यांपैकी 13 जिल्ह्यात पिण्यासाठी पाणी, जनावरांच्या चाऱ्याची परिस्थिती गंभीर आहे. यंदा मान्सूनचा पाऊस सर्वत्र चांगला झाला नाही. कोकण आणि गोव्याचा काही भाग, तसेच ठाणे आणि नांदेड जिल्हा सोडल्यास इतर ठिकाणी पाऊस सरासरी इतका आहे. तसेच राज्यातील 13 जिल्ह्यात तर सरासरी पेक्षा खूपच कमी पाऊस झालेला आहे. ज्यात अहमदनगर, छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड, धाराशिव,सोलापूर, सांगली, सातारा, परभणी, हिंगोली, वाशीम, अकोला, अमरावती या जिल्ह्यात सरासरी पेक्षा खूप कमी पाऊस



झाला असून, त्यांच्यावर दुष्काळाचे सावट आहे. त्यामुळे हे तेराही जिल्हे रेड झोनमध्ये असल्याचे हवामान विभागाकडून सांगण्यात आले आहे. जून ते सप्टेंबर असा पावसाचा कालखंड आहे. तर ऑगस्ट आणि जुलै महिन्यात सर्वाधिक पाऊस होत असतो. त्यानंतर सप्टेंबर महिन्यात पावसाचे प्रमाण कमी असते. मागील काही वर्षांचा इतिहास पाहिल्यास सप्टेंबर महिन्यात पाऊस कमीच असतो. दरम्यान, आजपासून पुढील पाच ते सात दिवसांचा अंदाज पाहिल्यास या काळात खूप असा पाऊस होईल याची शक्यता कमीच असल्याचे हवामान विभागाकडून सांगण्यात आले आहे. त्यामुळे मोठा पाऊस होण्याची शक्यता कमी आहे. यंदा राज्यात अनेक भागात सरासरीपेक्षा कमी पाऊस झाले असून, ज्यात 36 पैकी 13 जिल्ह्यांचा समावेश आहे. विशेष म्हणजे यात मराठवाड्यातील आठपैकी 6 जिल्ह्यांचा समावेश आहे. नांदेड आणि लातूर जिल्हा सोडल्यास छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड, धाराशिव,परभणी, हिंगोली या 6 जिल्ह्यात सरासरीपेक्षा कमी पाऊस आहे. त्यामुळे त्यांचा रेड झोनमध्ये समावेश करण्यात आला आहे. विशेष म्हणजे छत्रपती संभाजीनगर आणि जालना जिल्ह्यात परिस्थिती गंभीर असून, या दोन्ही जिल्ह्यातील अनेक गावात टॅंकरने पाणीपुरवठा केला जात आहे.

# कामगारांच्या व्यथा मांडणारा कथासंग्रह : हंगामी

आधुनिक केसरी

**एकशे चाळीस कोटी लोकसंख्या असलेल्या आपल्या भारत देशामध्ये सर्वच लोकांचे जीवनमान सारखे नाही. कुणी नवकोट नारायण आहे, तर कुणी दरिद्री नारायण आहे. हे ज्याच्या, त्याच्या कर्तबगारीवर अवलंबून आहे. कुणाला कमी श्रमात भरभरून मिळते तर कुणाला ढोरमेहनत करून सुद्धा किमान गरजेपुरतेही मिळत नाही. शेवटी त्याला, आपण नशीबच असे म्हणतो.**

ज्याचे नशिब बलवत्तर त्याला अपेक्षित सारे काही, विनासायास मिळते. परंतु मला तर ते खरे वाटत नाही. कारण की, आपले काही निर्णय चुकले तर त्यामुळे आपल्या संपूर्ण हयातीलाच कलाटणी मिळते , ती ईष्ट किंवा अनिष्ट असू शकते. आणि त्याचेच परिणाम आयुष्यभर भोगावे लागतात. त्यातूनच कुणाला चांगले भरभराटीचे दिवस येतात तर कुणाची वाईट स्थिती होते. यालाच आपण नशिबाने घडले असे म्हणून स्वतःची समजूत काढतो आणि दुःख करत बसत नाही. आणि हेच आरोग्याच्या दृष्टीने योग्य आहे.

वरील प्रमाणेच आशय असणारा, लेखक विलास पंचभाई यांचा "हंगामी" हा कथासंग्रह वाचनात आला. या कथासंग्रहात, त्यांच्या जीवनात घडलेल्या घटना व त्यांना आलेले अनुभव, काही अनुचित घेतलेल्या निर्णयामुळे बदलून गेलेले जीवनमान. त्यांनी एकूण दहा कथांमधून मांडलेले आहेत. कथासंग्रहाचे संपूर्ण वाचन झाल्यावर असे वाटते की, छे! हा कथासंग्रह नसून,हे तर त्यांचे आत्मचरित्रच आहे असेच जाणवते. लेखकांना त्यांच्या जीवनाच्या वेगवेगळ्या टप्प्यावर आलेले अनुभव आणि घटना,या पुस्तकामध्ये कथेच्या रूपात मांडलेल्या आहेत. त्यामुळे हे आत्मचरित्रच आहे असे प्रत्येक वाचकाला वाटणे साहजिकच आहे.

लेखकांनी जे-जे स्वतः भोगले आणि अनुभवले ते -ते त्यांच्या हृदयातून प्रकट झाले आणि ते लेखनीच्या साहाय्याने कागदावर अवतरले. त्यातूनच कथा तयार होऊन "हंगामी" हा कथासंग्रह तयार झाला. कथासंग्रहाचे मुखपृष्ठ पाहताच पुस्तकाच्या अंतरंगाचा अंदाज येतो, असे हे प्रभावी व अगदी समर्पक असे मुखपृष्ठ चित्रकार 'अरविंद शेलार' यांच्या कुंचल्यातून साकारले आहे. ज्ञानसिंधु प्रकाशन, नाशिक यांनी सदर कथासंग्रह प्रकाशित केला आहे. मुद्रण दोष निवारण करण्याचे काम अनंत वाणी यांनी केले आहे. अभ्यासपूर्ण आणि पुस्तकाच्या अंतरंगात घेऊन जाणारी प्रस्तावना लाभली आहे , संजय द. गोराडे यांची. शाबासकीची थाप किंवा लेखकाला कायम, लेखन प्रेरणा देणाऱ्या शुभेच्छांनी पाठराखण केली आहे, माजी कामगार युनियन अध्यक्ष, शिरीष यशवंत भावसार यांनी.

सदर कथासंग्रहात एकूण दहा कथांचा समावेश आहे. 'सत्पात्री दान ' या कथेमध्ये , त्यांच्या वडिलांना एका व्यक्तीकडून एक गाय दान म्हणून मिळाली होती. त्या गायीचे संगोपन, गायीमुळे त्यांच्या घरच्यांच्या दिनचर्येत झालेला बदल. आर्थिक परिस्थितीमध्ये झालेली प्रगती. आणि थोडा कटू आणि दुःखद शेवट असे वर्णन आढळते. 'शेजारधर्म' या कथेमध्ये घराच्या शेजारच्या व्यक्तींचे व्यक्ती चित्रण दिसून येते. शेजार धर्म कसा निभवावा? या साठी ही कथा ,वाचकांना निश्चितच मार्गदर्शक ठरेल असे वाटते. 'मायादी' या कथेमध्ये लेखकांनी त्यांच्या आतेबहिनी विषयी लिहिले आहे. माया दिदीच्या जीवनातील घडलेल्या घटनांमुळे तिचे संपूर्ण जीवनच बदलून गेले. तीला घरी प्रेम मिळाले नाही म्हणून तिने ते बाहेर शोधण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे तिच्या जीवनाची झालेली वाताहत हे तर, तरुण पिढीला मार्गदर्शकच ठरेल यात शंकाच नाही. 'बदली' या कथेतून,बदली झाल्याने आपल्या जीवनात काय-काय बदल होतात?आणि काय- काय भोगावे लागते? याचे तपशीलवार कथन केले आहे. या ठिकाणी बदली म्हणजे नोकरीच्या ठिकाणात बदल होणे. 'शिवलालशेठची भजी' या कथेमध्ये लेखकाने शिवलालशेठच्या भज्यांचे रंगतदार व चविष्ट असे वर्णन केलेले आहे, ते वाचतांना वाचकांच्या सुद्धा तोंडाला पाणी सुल्याशिवाय राहणार नाही. याच सारखे हंगामी , प्रेम, काळे गुरूजी, मागचे दार आणि प्रमोशन या कथांमधून मांडलेले अनुभव तथा विचार हे वाचकांना मार्गदर्शकच ठरेल असा विश्वास व्यक्त करतो. सदर कथासंग्रहातील मुद्रण दोष निवारण करण्याचे काम काटेकोर पणे करण्यात आलेले आहे, परंतु काही मुद्रण दोष कायम राहिले आहेत. शेजारधर्म या कथेमध्ये एक शब्द गळाल्यामुळे वाक्याचा अर्थच बदलून गेला आहे .ते वाक्य म्हणजे, "तीसुद्धा इहलोकी निघून गेली." या वाक्यातील 'सोडून' हा शब्द गळाल्याने योग्य बोध होत नाही. या ठिकाणी इहलोक म्हणजे , आपण सध्या तेथे राहतो ते ठिकाण. हे वाक्य "तीसुद्धा इहलोकी सोडून निघून गेली"असे अपेक्षित होते. लेखकाचा कथासंग्रहाचा पहिला प्रयत्न असल्याने त्यांच्याही नजरेतून काही बाबी सुटल्या असाव्यात असे वाटते. सदर कथासंग्रह वाचनीय तथा सर्वांना मार्गदर्शकच ठरेल यात शंकाच नाही. सर्वांनी संग्रही ठेवावा याच पात्रतेचा लेखक, विलास पंचभाई यांचा हा कथासंग्रह आहे. लेखकाच्या उज्ज्वल भविष्याची कामना करून, साहित्यिक प्रवासाला खूप खूप शुभेच्छा!

**पुस्तकाचे नाव- हंगामी.**
**लेखक- विलास पंचभाई.**
**प्रकाशक- ज्ञानसिंधु प्रकाशन, नाशिक.**
**पृष्ठे - १४८. . किंमत - २००/-**

रामदास राजेगांवकर
९४२०२३३०३२

# समाज संत हरपला



प्रा.बरसमवाड विठ्ठल
गोकुळवाडी. ता. मुखेड

आधुनिक केसरी

**महाराष्ट्रात जवळ जवळ 75 वर्ष वैष्णव संप्रदायाची सेवा करून समाजाला अंधारातून प्रकाशाकडे नेण्याचे महान कार्य त्यांनी केले, बुरसटलेल्या रूढी परंपरांना बाजूला सारून समाज चैतन्यमय केले,, भावनेची भाषा भावनेला कळाली, विठ्ठरायाशी एकरूप होऊन समाज सुधारण्याचा विडा त्यांनी उचलला, आयुष्यभर चारित्र्य संपन्न जीवन जगले, आपल्या जीवनात त्यांनी कोणाला कधी ही कमी लेखले नाही या रे या रे लहान थोर म्हणून सर्वांना जवळ केले अशा या महान संताविषयी दोन शब्द .**

खूप जवळचा अगदी हृदयाशी नाते असलेला मित्र जावा आणि त्याच्यावर श्रद्धांजलीपर लेख लिहिण्याचा दुर्दैवी प्रसंग एखाद्यावर यावा, याच्यापेक्षा मोठे दुःख नाही. शंभर मेले तरी चालतील परंतु त्यांचा पोशिंदा जगलाच पाहिजे. वरकरणी हे वाक्य अनेकदा वाचलं होतं; परंतु त्याची धग, व्याप्ती, झळ, वेदना, खोली, गहिरेपणाची अनुभूती आल्याशिवाय या वाक्याचा अर्थ उमगला नव्हता ,आज बाबा महाराजांच्या जाण्याने मला तो समजला, अचानक ही बातमी प्रसारमाध्यमांकडून कळाली आणि मन विषन्न होऊन डोकं सुन्न झालं, काही सुचत नव्हतं अनेक जुन्या स्मृतींना उजाळा देत मनः पटला वरून अनेक प्रसंग भराभर चालत चित्राप्रमाणे सरकत होते.

त्यांची देहबोली सुमधूर आवाज आज कानात गुणगुणतो, फक्त दहावीपर्यंत शिकलेला व्यक्ती लाखो लोकांशी बोलतो, पंढरीच्या पांडुरंगाचे भक्त व वारकरी म्हणून समाजात त्यांची तीन पिढ्यापासूनची वारकरी परंपरा खरोखरच शोभून दिसते, माणसं शिक्षणानेच मोठे होतात, असं काही नाही त्या माणसात सामाजिक बांधिलकीची जाणीव प्रगल्भ असली की त्यांच्यात समाजाला समजून घेण्याची विलक्षण जिद्द असते. सार्वजनिक जीवन जगत असताना त्यांनी समाजातील तळागाळातील लोकांना मानले. महाराष्ट्रात अनेक ठिकाणी त्यांचे कीर्तन, प्रवचन झाले. जो जे वांचील। तो ते लाहो।। या पसायदानाच्या ओवी प्रमाणे त्यांनी कोणाचेही काम पूर्वग्रह दूषित दृष्टिकोन न ठेवता त्यांना न्याय देण्याची भूमिका निभावली ,अफाट भक्तगण ,शिष्यगण गोळा केले, आजाद शत्रू म्हणून वारकरी संप्रदायात त्यांची हितचिंतक उल्लेख करतात. अंधश्रद्धेच्या वाटेने न जाता सदसद विवेक बुद्धीने ते आपल्या अभंगातून लाखो लोकांशी निरूपण करतात. अशा या महान कीर्तनकाराचा जन्म 5 फेब्रुवारी 1936 रोजी झाला, त्यांचे मूळ नाव निळकंठ ज्ञानेश्वर गोरे असे होते .संपूर्ण आयुष्य त्यांनी कीर्तन परंपरेला वाहिलेलं होतं. आपल्या रसाळ वाणीतून कोट्यावधी लोकांना त्यांनी खरा तो एकची धर्म शिकवला . त्यांच्या घरामध्ये वारकरी संप्रदायाची , 135 वर्षाची परंपरा आहे ,ते 12 वर्षाचे असतानाच मुंबई येथील मुंबई आकाशवाणी वर गाण्यास सुरुवात केली , तेव्हापासून त्यांच्या मनात परिवर्तन झाले ,अफाट प्रसिद्धी मिळाली, आणि मग कीर्तनामागून कीर्तन सुरू झाले , प्रपंच नेटका ठेवून त्यांनी समाजाला मार्गदर्शन करण्यास सुरुवात केले ,26 मार्च 1954 ला त्यांचा विवाह दुर्गाबाई नामदेव जाधव यांच्याशी झाला; काही काळ त्यांनी फर्निचरचा व्यवसाय केला नंतर ते कीर्तन करू लागले, संत ज्ञानेश्वर महाराज व जगद्गुरु तुकाराम महाराज यांच्या दोन्ही पालख्यांच्या मानकरी परंपरा त्यांच्या घराण्यात आजही आहेत. तीन पिढ्यांपासून त्यांच्या घराण्यात कीर्तनाची परंपरा चालू आहे. पंढरीचा पांडुरंग आणि वारकरी संप्रदाय यांच्याशी त्यांनी आपले नाते जोडले,वारकरी संप्रदायामध्ये ते एवढे एकरूप झाले की वारकरी संप्रदायाला त्यांनी अंधश्रद्धेतून बाहेर काढून त्यांनी लोकांमध्ये चैतन्य निर्माण केले,म्हणून लोकांनी त्यांना आनंदाने बाबा महाराज म्हणू लागले ,आणि हेच नाव पुढे बाबा महाराज सातारकर या नावानेच ते संपूर्ण जगाला परिचित झाले ,आज पर्यंत त्यांनी 15 लाख लोकांना वारकरी संप्रदायाची दीक्षा दिली ,तसेच लाखो लोकांना व्यसनमुक्त केले. व्यसनामुळे अनेक लोक देशोधडीला लागलेले आहेत, व्यसन हे माणसाला घातक असते, समाजातून ते बाहेर काढून टाकते, व्यसनाची नशा ही वाईट प्रवृत्तीकडे नेते म्हणून त्यांनी व्यसना बद्दल माहिती सांगून अनेक तरुणांना व्यसनापासून दूर ठेवले, समाजासाठी त्यांनी केलेले कार्य अमूल्य आहे.

**मोडलेल्या माणसाचे दुःख ओले झेलताना**
**त्या अनाथाच्या उशाला दीप लावू झोपताना**
**कोणती ना जात त्यांची कोणता ना धर्म त्यांना**
**दुःख भिजले दोन अश्रू माणसाचे माणसांना**

महाराष्ट्राच्या राज्यपालांचे हस्ते प्लॅटिनम डिस्क देऊन सरगम कॅसेटच्या वतीने त्यांचा यथोचित गौरव करण्यात आला. महाराष्ट्र शासनातर्फे व्यसनमुक्ती पुरस्कार. जागतिक मराठी परिषद नवी दिल्ली तर्फे त्यांचा सत्कार करण्यात आला. 1983 मध्ये श्री चैतन्य अध्यात्मिक ज्ञान प्रसार संस्था त्यांनी स्थापन केली, पांढरे शुभ्र धोतर, सदरा डोक्यावर बांधलेला फेटा कपाळावर लावलेले गोपीचंदन त्यामुळे हा जणू काही वैष्णव धर्माचा प्रसारक वाटावा ,असे विलोभनीय व हसतमुख व्यक्तिमत्व म्हणजेच बाबा महाराज सातारकर यांनी अनेक भक्तगण गोळा केले. खरोखरच हे एक बहुश्रुत व्यक्तिमत्व होतं .स्वतःच्या शब्दावर त्यांचा विश्वास होता. मातीशी एकरूप असणार हे नातं सर्वांच्या मनाला दुःख देऊन गेलं. माणसं जोडणारा माणूस असे आपल्याला त्यांना म्हणता येते निर्मळ मनाचा मर्यादा पुरुषोत्तम, सर्वगुणसंपन्न, पंढरीचा वारकरी, रेशीम बंध जोपासणारा, चैतन्याचा महामेरू, यांच्या आठवणी कायम आमच्या स्मरणात राहतील, पंढरपूर येथील मठात चालणारे त्यांचे आषाढी एकादशीचे कीर्तन जणू काही अमृताच्या धारा आहेत असा भास होत असे. मानवाला प्राचीन काळापासून आपल्या बौद्धिक क्षमतेने दुसऱ्या व्यक्तींना जिंकता येते ,काही लोक संशोधनातून तर काही लोक अनुभवातून आपले विचार प्रकट करतात तर काही लोक अल्प ज्ञानातून स्वतःच्या तर्कातून संशयाच्या आधारावर आपले विचार प्रकट करतात. परंतु काही माणसे कारण नसताना आपली मते मांडून निरर्थक वाद घालतात काही लोक केवळ लेखन व भाषणावरच उदरनिर्वाह चालवतात या सर्व गोष्टी बाजूला सारून इष्ट ते बोलणार, सत्य ते सांगणार म्हणून महाराजांनी सर्वत्र ख्याती होती, प्राणीमात्रावर दया केली पाहिजे, अहंकार गेला ।तुका म्हणे देव झाला।*मनुष्याने अहंकार सोडून द्यावे, आजपर्यंत अहंकाराने वाईटच घडले आहे, रावणाचा अहंकार वाईटा कडे घेऊन गेला, कंस राजा कृष्णाचा मामा असून अहंकारामुळे मृत्यूकडे गेला, मानवाच्या मनात आजही काही अंधश्रद्धा आहेत, असे स्पष्टपणे बाबा महाराज सातारकर यांनी आपल्या कीर्तनातून समाजाला रोखठोक उत्तरे देऊन, गर्व किती वाईट आहे हे पटवून दिले. आज मानव चंद्रावर मंगळावर पाऊल ठेवत आहे, 21 व्या शतकात जगत असताना बुरसटलेल्या गोष्टीच्या मागे लागणे योग्य नाही असे ते स्पष्ट सांगत असत, संपूर्ण आयुष्यात त्यांनी बुवाबाजी पासून दूर राहिले, कोणत्याही पद्धतीने कोणालाही ठकविले नाही ,बुवाबाजीचा इतिहास सर्वांना माहिती आहे, म्हणून काही आज्ञांनी वा अंधश्रद्धाळू लोकांना ते पटते व नंतर संसाराची राख रांगोळी होते हे आपल्या कीर्तनातून ते सांगतात. आज ते आपल्या देहाने निघून गेलेले असले तरीही आपल्या मनात ते कायम राहतील असे मला वाटते, बाबा महाराज सातारकर यांचे 89 व्या वर्षी मुंबईच्या नेरूळ येथे प्राणज्योत मावळली, या जगात मिळेपर्यंत आणि गमावल्यानंतर प्रत्येक गोष्ट महत्त्वाची वाटते.

**गेले दिगंबर ईश्वर विभूति।। राहिल्या त्या कीर्ती जगा माजी। वैराग्याच्या गोष्टी ऐकल्या त्या कानी ।। आता ऐसे कोणी होणे नाही ।।**




# वारकरी संप्रदायाचे तत्त्वज्ञान मांडणारा महामेरू काळाच्या पडद्याआड

आधुनिक केसरी

**महाराष्ट्रातील वारकरी संप्रदायातील प्रसिद्ध कीर्तनकार ह.भ.प. बाबा महाराज सातारकर यांची आज प्राणज्योत मालवली. त्यांनी वयाच्या 11 व्या वर्षांपासून पुरोहित बाबा, आग्रा घराण्याचे लताफत हुसेन खॉ साहेब यांच्याकडून शास्त्रीय गायनाचे धडे घेत वारकरी संप्रदायातील द्वैत, अद्वैत परंपरेचे दर्शन घडवून आणले. ज्ञानेश्वरीवर उत्तम प्रवचन करण्याचा त्यांचा हातखंडा होता. दरवर्षी संतांच्या गावी कीर्तन सप्ताह आयोजित करून संतांचे विचार तळागळात पोहोचवण्याचे कार्य त्यांनी केले. त्यांची देशविदेशात अनेक प्रवचने आणि कीर्तने प्रचंड गाजली. ते उत्तम पखवाजवादक होते. सुमारे 57 ध्वनिफिती, 12 सीडी संग्रह, अनेक ग्रंथसंपदा प्रकाशित करून वारकरी संप्रदायाचे तत्वज्ञान आणि समाजसेवा यांचा सुंदर समन्वय आपल्या जीवन कर्तृत्वाने साध्य केला. हा समन्वय साधणारा महामेरू काळाच्या पडद्याआड गेल्याने वारकरी आणि कीर्तन परंपरेची मोठी हानी झाल्याच्या भावना आधुनिक केसरीस मान्यवरांनी मांडल्या...**

**वारकरी संप्रदायाचा हिरा हरपला...**

सनातन धर्म संस्कृती व गिता निरूपणकार, संसार आणि परमार्थ समजावुन सांगत पांडुरंग भक्तीचे वेड लावणारा देवदुत शास्त्रीय संगीताचे जादूगार आज इहलोकीचा प्रवास थांबवुन कायमस्वरूपी वैकुंठवासी झाले. त्यांच्या जाण्याने वारकरी संप्रदायाची फार मोठी न भरुन येणारी हानी झाली आहे. त्यांच्या पुण्यात्म्याला सद्गती प्राप्त होवो. हे म्हणण्या इतके पुण्यवान आपन नाही. हिच भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करताना अंतःकरणात कल्लोळ उठतो. **- ह.भ.प. अजबरा मिरजे**

**कीर्तनातून आदर्श वारकरी निर्माण केला...**

हरिभक्त पारायण बाबा महाराज सातारकर हे संपूर्ण वारकरी संप्रदायाचे भूषण होते ते केवळ वारकरी कीर्तनकार नव्हते तर यशस्वी फडकरी पंढरीचे वारकरी होते. संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्यात त्यांचा पालखी सोहळा हा मानाचा असे. त्यांनी वारकऱ्यांना सुस्वर हरिपाठ याची गोडी लावली. तसेच सुस्वर कीर्तन कसे असते याचा आदर्श वारकरी कीर्तनकारांमध्ये निर्माण केला.

**- ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज वाबळे**

**वारकरी संप्रदाय पोरका झाला...**

ह.भ.प. बाबा महाराज सातारकर हे वैकुंठवासी झाले हे ऐकून अतिशय वाईट वाटले. संपूर्ण वारकरी संप्रदाय आज त्यांच्या मार्गदर्शनाशिवाय पोरका झाला. माझा आणि बाबा महाराज सातारकर यांचा परिचय सुमारे 30 वर्षांपासूनचा होता. ते यशस्वी कीर्तनकार होते, गायक होते, प्रवचनकार होते. त्यांना महाराष्ट्र शासनाचा अतिशय प्रतिष्ठेचा असा "ज्ञानोबा तुकाराम पुरस्कार" प्राप्त झाला होता. त्याशिवाय त्यांना सातारा भूषण पुरस्कारही प्राप्त झाला होता. वारकरी कीर्तनाचे ते आदर्श होते. त्यांची आठवण सदैव येत राहील.

**- डॉ. प्रकाश खांडगे, संत साहित्याचे अभ्यासक**

**बाबा कीर्तनाचा त्रिवेणी संगम होते...**

आदर्श कीर्तन, चिंतनपर निरूपण, सुस्वर अभंग गायन याचा त्रिवेणी संगम म्हणजे हरिभक्त परायण बाबा महाराज सातारकर होते. त्यांच्या निधनाने महाराष्ट्रातील वारकरी संप्रदाय आज पोरका झाला आहे त्यांनी ज्ञानेश्वरी आणि हरिपाठ घरोघर पोहोचविला. हे झालेले दुःख अस्वस्थ करणारे आहे.

**- ह.भ. प. पंकज महाराज गावडे**

**परमार्थ आणि समाजसेवा यांचा सुंदर समन्वय...**

न्यू सातारा समूह आणि बाबा महाराज सातारकर यांचे ऋणानुबंध अनेक वर्षांचे होता. न्यू सातारा समूहाला प्रेरणा देण्याचे काम बाबा महाराज सातारकर यांनी केले. परमार्थ आणि समाजसेवा यांचा सुंदर समन्वय म्हणजे हरिभक्त परायण बाबा महाराज सातारकर होते. त्यांनी वारकरी संप्रदायाला एक वेगळे वळण दिले. या वळणावर संप्रदाय चालत असल्याने त्यांची आठवण सदैव आल्याशिवाय राहत नाही.

**- राजाराम तथा नानासाहेब निकम, न्यू सातारा समूहाचे प्रमुख**




# मोदी सरकार पब्लिसिटीचे व कॅनव्हासिंगचे : ॲड. आंबेडकर

## हजारोंच्या उपस्थितीत धुळ्यात वंचितची आदिवासी एल्गार सभा संपन्न

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** ॲड. आंबेडकरांचे भिमनगर येथे जोरदार स्वागत करण्यात आले. सभेच्या ठिकाणी आंबेडकरांचे आगमन होताच लेझीम पथक, रमाईच्या लेकी ग्रुप, पारंपरिक आदिवासी नृत्याने जोरदार स्वागत करून आंबेडकरांना सभामंडपापर्यंत आणण्यात आले. यावेळी समता सैनिक दल व महार रेजिमेंटच्या सैनिकांनी आंबेडकरांना मानवंदना दिली, त्यानंतर क्रांतिवीर उमाजी नाईक, तंट्या भिल, राणा पुंजाजी भिल, ख्वाजा नाईक यांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले. सभे पूर्वी घनश्याम थोरात यांचा वादळ परिवर्तनाचे हा प्रबोधन गीतांचा कार्यक्रम पार पडला. नरेंद्र मोदींचे सरकार हे पब्लिसिटी व कॅनव्हासिंगचे सरकार असून मोदींची माझ्याशिवाय कुणीच नाही ही मानसिकता लोकशाहीसाठी धोकेदायक असल्याची घणाघाती टीका वंचित बहुजन आघाडीचे सर्वेसर्वा ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी बुधवारी धुळ्यात विद्यावर्धिनी महाविद्यालयाच्या मैदानावर झालेल्या आदिवासी एल्गार सभेत केली. वंचितच्या एकलव्य आघाडीतर्फे या सभेचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी ॲड. आंबेडकर बोलत होते.



आपल्या अभ्यासपूर्ण भाषणातून ॲड. आंबेडकर यांनी भाजप, आरएसएस व पंतप्रधान नरेंद्र मोदींवर जोरदार टीका केली. ते म्हणाले की, आता निवडणूक येतील तेव्हा मोदी नवा फंडा आणतील. तो म्हणजे एनसीईआरटीची पुस्तके नव्याने छापायची. त्यावर इंडियाऐवजी भारत असे छापायचे. ५०० रुपयांच्या नोटांवर इंडियाऐवजी भारत छापायचे म्हणजे ५०० च्या चलनी नोटा बाद होतील. जी २० परिषदेवर १ लाख १३ हजार कोटींचा खर्च झाला. या संख्येला देशातील दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांच्या संख्येने भागिले तर किती रुपये एका दारिद्र्यरेषेखालील कुटुंबाला मिळतील असा प्रश्न ॲड. आंबेडकरांनी उपस्थित जनसमुदायाला विचारला. यावर काही वेळाने एका प्रेक्षकाने एका कुटुंबाला ७१ लाख रुपये मिळतील असे उत्तर दिले. आंबेडकर यावर बोलताना म्हणाले की यामुळे देशातील गरिबी मिटली असती. मात्र भाजप, सनातन, आरएसएस ला मोदी हे देशाचे नव्हे तर जगाचे नेते आहेत हे दाखवायचे होते म्हणून ही परिषद होती. मात्र मोदी हे लोकप्रिय नव्हे तर मूर्ख आहेत हे जो बायडेन यांनी दाखवून दिले. यावर आंबेडकरांनी दिलेले ग्लासचे उदाहरण ऐकून सभेत मोठा हशा पिकला. मोदी हे मुस्लिम नाहीत. अमित शहा हे मुस्लिम नाहीत. न्यायमूर्ती चंद्रचूड हे मुस्लिम नाहीत. मग हिंदू धर्म खतरेमे कसा याचे उत्तर सनातनवाद्यांनी द्यावे असे आव्हानही आंबेडकर यांनी दिले. इस्लाम खतरेमे ही घोषणा मुस्लिमांकडून भीतीने दिली जाते. आरएसएस या घोषणेची कॉपी करत असल्याचे आंबेडकर म्हणाले. लोकशाहीत सामान्य माणसाला नागवण्याचे काम सुरु आहे. हे थांबवायचे असेल तर वंचितच्या हाती सत्ता द्या असे आवाहन आंबेडकरांनी केले. राज्यघटनेत ५ व ६ व्य अनिच्छेदानुसार जल, जंगल, जमीन यावर आदिवासींचे राज्य असायला हवे. या राज्यात पंतप्रधान नाचे तर राष्ट्रपती, राज्यपाल व आदिवासींचे रसरकार चालेल. मात्र पेसा कायदा आणून घटनेतील तरतूद बाजूला सारली म्हंणून आदिवासी वंचित राहतोय. रयतेच्या मराठ्याला सत्तेतील निझामी मराठा आरक्षण देणार नाही असेही आंबेडकर यांनी नमूद केले.

# हरवलेले 'क' वर्ग प्राप्त सप्तशृंगी मंदिर सापडेना

## ३ दिवस उत्खनन : अखेर नवीन मंदिराचे पूजन



आधुनिक केसरी न्यूज

**गोकुळसिंग राजपूत**

**जामनेर :** तालुक्यातील पहूर येथे पहूर कसबे गावाच्या प्रवेशद्वारापाशी हरवलेले जय सप्तशृंगी मातेचे 'क ' वर्ग दर्जा प्राप्त मंदिर शोधण्यासाठी तीन दिवस उत्खनन करण्यात आले. मात्र वीस फूट खोल खोदूनही मंदिर हाती लागले नसल्याने अखेर जय सप्तशृंगी माता ट्रस्टचे अध्यक्ष यांनी नवीन मंदिर उभारण्यासाठी भूमिपूजन करून घेतले. मात्र दैनिक आधुनिक केसरी वृत्तपत्रात बातमी येताच घेतली दखल या दरम्यान भाविकांची फसवणूक करणाऱ्या ट्रस्ट विरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्याची मागणी संतप्त भाविकांनी केली आहे. याबाबत अधिक माहिती अशी की, ग्रामीण तीर्थक्षेत्र विकास योजनेअंतर्गत ग्रामीण भागातील ऐतिहासिक आणि धार्मिकदृष्ट्या महत्त्व असलेल्या तीर्थक्षेत्रांना विकास कामांसाठी राज्य शासनाच्या ग्रामविकास खात्यातर्फे सुरुवातीला 'क 'वर्ग दर्जा दिला जातो . जशी -जशी भाविकांची संख्या वाढत जाते तसा -तसा संबंधित देवस्थानाचा वर्ग वाढविण्यात येतो . त्या माध्यमातून कोट्यावधी रुपये विकास कामांसाठी शासनातर्फे दिले जातात.

परंतु पहुर येथील जय सप्तशृंगी माता निवासिनी ट्रस्टने कोणतेही मंदिर अस्तित्वात नसताना बनावट कागदपत्रे सादर करून प्रशासनाची दिशाभूल करत 'क 'वर्ग दर्जा प्राप्त करून घेतला . खर तर 'क ' हा दर्जा मंदिराला मिळतो . परंतू मंदिरच अस्तित्वात नसताना 'क 'वर्ग मिळाला कसा ? असा प्रश्न संतप्त भाविकांना पडला आहे. संबंधित ट्रस्टला ग्रामपंचायतीने जागेचा मालकी हक्क देखील प्रदान केला असून नमुना नंबर ८ ला तशी नोंद करण्यात आली आहे . जय सप्तशृंगी मा निवासिनी ट्रस्ट चे मंदिर कोठे आहे ? मंदिरच नाही तर हजारो भाविक आले कसे ? केवळ शासकीय अनुदान लाटण्यासाठीच कागदोपत्री मंदिर उभारून भाविकांची आणि प्रशासनाची देखील दिशाभूल झाली असल्याने संबंधितांवर फसवणुकीचा गुन्हा दाखल करावा, अशी मागणी संतप्त भाविक करत आहेत. संबंधित ट्रस्टने तीन दिवस उत्खनन करून देखील मंदिर हाती न लागल्याने नवीन मंदिर उभारणीचा निर्णय घेतला आहे. नुकतेच विजयादशमीच्या शुभ- पर्वावर समर्थ विठ्ठल मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष हरिभक्त परायण विठ्ठल केशव राऊत यांच्या हस्ते पूजन करण्यात आले . मात्र अद्याप कोणतीही कारवाई संबंधितांवर झालेली नसल्याने भाविकांचा उद्रेक होण्यापूर्वीच प्रशासनाने संबंधितांवर फसवणुकीचे गुन्हे दाखल करावेत अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही भाविकांनी दिला आहे.



# रात्रीचा सिंगल फेज वीज पुरवठा सुरू करा : स्वाभिमानीची मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**जळगाव जा :** शेतातील रात्रिचा सिंगल फेज विज पुरवठा सुरु करा अशी मागणी स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी उपविभागीय अभियंता जळगाव कार्यालयाकडे लेखी निवेदनातून केली आहे. गेल्या अनेक दिवसा पासून शेति पंपाचा रात्रीचा सिंगल फेज विज पुरवठा बंद आहे.

पुढील आठवड्यात आता रब्बी ची पेरणी होऊ घातली आहे, त्या मधे हरभरा, कांदा, भाजीपाला इत्यादी पिकाची लागवड आपल्या भागात मोठ्या प्रमाणात केली जाते. पिकावर हरिणाच्या टोळी चे तूफान आक्रमण असते. या आक्रमनाला थोपविन्यासाठी शेतकऱ्यांना शेति मधे चोवीस तास जागता पहारा द्यावा लागतो. सर्व शेती सातपुड्याच्या पायथ्याशी असल्याने शेताच्या बाजुला घणदाट जगंल आहे. रात्रीच्यावेळी जंगलात जनावरांचे साम्राज्य असल्याने साप, विंचू, यांचे सह अस्वल, कोल्हा लांडगे, बिबट्या आदी जनावारांचा मोठा जीवघेणा धोका निर्माण होतो. त्यामुळे आदिवासी पट्ट्यात येत असलेल्या फिडरवरील कृषी क्षेत्रातील रात्रीच्या नियोजित थ्री फेज वेळापत्रकानुसार वीज पुरवठा सुरु होत नाही तो प्रर्यंत कृषी फीडर वरील सिंगल फेज वीज पुरवठा कायम सुरु करण्यात यावा आणि कपाशी लागवड च्या काळात थ्री फेज वीज पुरवठा सुरळीत ठेवण्यात यावा अन्यथा. आमचे रात्रीच्या वेळी जंगलात बरे वाईट झाल्यास संबंधित विभाग जबाबदार असणार, व कोणत्याही क्षणी कार्यलयावर आंदोलन करन्यात येईल असा इशारा स्वाभिमानीचे विदर्भ अध्यक्ष प्रशांत डिक्कर यांनी निवेदनातून दिला आहे. या निवेदनावर सुरेश मुजलदा, तेजराव लोणे, विलास इंगळे, देवानन जाधव, प्रकाश धुर्डे, गजानन जामनकर, सतिष कनासे, प्रताप अखाड्या, रामसिंग खिराडे, राजेश भाबर, लालसिंग चंगोल, विजय चगोंल सह बहुसंख्य कार्यकर्ते व शेतकरी उपस्थित होते..

# पुरंदर तालुक्यात आम आदमी पक्षाची बैठक संपन्न

## बैठकी दरम्यान अनेकांनी घेतला पक्षात जाहीर प्रवेश

आधुनिक केसरी न्यूज



**सुशिल गायकवाड**

**निरा :** आम आदमी पार्टीच्या वतीने निरा-शिवतक्रार येथे श्री.महालक्ष्मी माता मंदिरा मध्ये बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीसाठी आम आदमी पार्टीचे पुणे जिल्हाध्यक्ष अमोल देवकाते, पुरंदर तालुकाध्यक्ष दत्तात्रय कड,पुरंदर तालुका युवाध्यक्ष शमहेश (आण्णा) अर्जुनराव जेधे, निरा-शिवतक्रार गावचे उपाध्यक्ष हरूनभाई बागवान,वाल्हे गावचे अध्यक्ष राजन पवार, पिसावरे गावचे उपाध्यक्ष शहाजी कोलते आदीं सह कार्यकर्ते व पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी अनेकांनी आम आदमी पार्टी या पक्षात प्रवेश केला.पुरंदर मधील निरा-शिवतक्रार सह जेजुरी, वाल्हे, कर्नलवाडी व पिसुर्टी आदी गावात बैठक संपन्न होत असताना काही लोकांनी आम आदमी पक्षाच्या दिशेने वाट धरलेली असून पुढील महिन्यात अनेक गावातील व जिल्हा परिषद गटातील अध्यक्ष, कार्याध्यक्ष, उपाध्यक्ष, संघटक सचिव, खजिनदार आधी पद नियुक्ती केली जाणार आहे.निरा-शिवतक्रार पंचक्रोशीतील मनीषा देशमुख,मीनाक्षी कदम, उमेश खोपडे, शिवाजी गोरे तसेच जेजुरी येथील मामुदभाई शेख, दिलावर सय्यद, फिरोज मणेर, इस्माईल तांबोळी, मुस्ताक काजी, शारुख भाई, शेखर ननावरे, दत्ता वाईकर, गुलाबभाई शेख आणि वाल्हे येथील राजन पवार, पिसुर्टी दादा बरकडे, कर्नलवाडी (कोंडेवस्ती) चे श्रीकांत कोंडे आदींनी पक्षात प्रवेश केला. मार्गदर्शन करताना जिल्हाध्यक्ष अमोल देवकाते म्हणाले की, आज रोजी महाराष्ट्रातील पक्ष फुटीचे चित्र पाहून जनता नाराज आहे.आपचे पक्ष प्रमुख यांचे दिल्लीतील व पंजाबमधील कामकाज पाहून जनता खुप खूश आहे. आता तरुण वर्गालाच नव्हे तर सर्वच जनतेला आता भारत देश भ्रष्टाचार मुक्त पाहिजे.तरुणांना रोजगार,शेतकऱ्यांना न्याय पाहिजे. आदमी पार्टी हा राष्ट्रीय पक्ष असल्याने त्याची भविष्यात अनेक राज्यात बहुमताने सत्ता येईल, असा विश्वास देवकाते यांनी व्यक्त केला.

आपची ध्येय-धोरणे, उद्दिष्ट आणि तत्वे हे छत्रपती शिवाजी महाराज आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारा प्रमाणेच आहेत. सर्व सामान्य व प्रामाणिकपणे काम करणाऱ्या नागरिकांना विद्यार्थ्यांना, तरुणांना, जनतेला, कामगारांना, शेतकऱ्यांना,नोकरदारांना व व्यवसाय करणाऱ्या लोकांना निस्वार्थी पणे न्याय-हक्क आणि अधिकार मिळवून देण्याचे काम करत आहे. सर्व सामान्य जनतेला मोफत शिक्षण, आरोग्य सेवा, शुद्ध पाणी, लाईट, रस्ते, नोकरी, व्यवसाय मार्गदर्शन, ग्रंथालय वाचानालय अशा अनेक प्रकारच्या सोई सुविधा उपलब्ध करुन देण्याचे काम आप करत आहे. सध्या संपूर्ण महाराष्ट्रात अल्प स्वरूपात पाऊस झाल्याने आपकडून सर्वसामान्य जनतेला व शेतकरी बांधवांना आधार देण्यासाठी त्वरित जनावरांना मोफत चारा छावणी व सबंध महाराष्ट्रातील सर्व सरकारी शाळा महाविद्यालयातील फी माफीसाठी तहसीलदार-प्रांताधिकारी-मुख्यमंत्री-पालकमंत्री यांच्याकडे पाठपुरावा चालू आहे, असे सुद्धा महेश जेधे यांनी म्हटले. बैठकीदरम्यान पदाधिकाऱ्यांकडून पुरंदर मधील कामाचे विशेष कौतुक करण्यात आले. पक्षात प्रवेश केल्याबद्दल नूतन पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करण्यात आले.

# लढाऊ कामगार नेते सुरेश पाटील यांचा सत्कार

आधुनिक केसरी न्यूज

**उरण :** 'नवी मुंबई पुनर्वसन सामाजिक संस्था'चा ५ वा वर्धापन दिन वाशी मध्ये मोठ्या उत्साहात संपन्न झाला. यावेळी 'संस्था'च्या वतीने घेण्यात आलेल्या 'लोकनेते दि. बा. पाटील ऊर्जास्थान' या चळवळ स्पर्धेच्या माध्यमातून 'दिबां'चे कार्य साहित्य आणि कला स्वरुपात सादर केलेल्या गुणवंतांचा गुणगौरव सन्मान आमदार गणेश नाईक, 'दि. बा. पाटील नवी मुंबई आंतराष्ट्रीय विमानतळ नामकरण सर्वपक्षीय कृती समिती'चे अध्यक्ष दशरथ पाटील, माजी खासदार संजीव नाईक, 'दिबां'चे सुपुत्र अतुल पाटील, आयोजक दशरथ भगत, आदिंच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आला. यावेळी लोकनेते दिबा पाटील यांच्यासोबत शेतकऱ्यांच्या अनेक आंदोलनात सहभाग घेतलेल्या व ७ दिवस नाशिक कारागृहात तुरुंगवास भोगलेले उरण जासईचे सुपुत्र, कामगार नेते सुरेश पाटील यांचा यावेळी आ.गणेश नाईक यांच्या हस्ते विशेष सत्कार करण्यात आला. सुरेश पाटील यांनी लोकनेते दिबा पाटील यांच्या आंदोलनात भाग घेतला होता. समाजकार्य करत करत गोर गरिबांची सेवा केली.स्थानिक भूमीपुत्रांमध्ये रोजगार, नोकरी व इतर महत्वाच्या विषयावर जनजागृती केली. लोकांना एकत्र केले.

## निधनवार्ता

### शशांक देशपांडे



**छत्रपती संभाजीनगर :** सिडको येथील रहिवासी शशांक देशपांडे (५४ वय ) यांचे दि. २६ ऑक्टोबर गुरूवारी रात्री आजाराने निधन झाले. त्यांच्या मागे पत्नी, दोन मुले असा परिवार आहे. आटपाडी जिल्हा सातारा येथील एलआयसीमध्ये शाखाधिकारी पदावर कार्यरत होते. आपल्या मनमिळाऊ व कष्टाळू स्वभावामुळे ते प्रसिद्ध होते. त्यांच्या निधनामुळे सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.



# लिहा जहागीर येथे सकल मराठा समाजातर्फे उपोषण

आधुनिक केसरी न्यूज

**सुधाकर जेठे**

**फुलंब्री :** तालुक्यातील लिहा जहागीर येथे सकल मराठा समाजातर्फे गुरुवार २६ ऑक्टोबरपासून लाक्षणिक उपोषण करण्यात आले आहे. मराठा समाजाला आरक्षण मिळावे यासाठी मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी जालना जिल्ह्यातील अंतरवाली सराटी येथे गुरुवारपासून आमरण उपोषणाला सुरूवात केली आहे.

जरांगे पाटील यांनी सकल मराठा समाजाने मराठा आरक्षणासाठी सर्कल, गावपातळीवर साखळी उपोषण करावे, असे आवाहन सकल मराठा समाजबांधवांना केले होते. जरांगे पाटील यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत लिहा जहागीर येथील ग्रामस्थांनी गुरुवारी एकदिवसीय लाक्षणिक उपोषणास सुरूवात केली. प्रथम सकाळी स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, सावित्रीबाई फुले, राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर, महात्मा गांधी यांच्या प्रतिमेला हारार्पण करून या एकदिवसीय लाक्षणिक उपोषण सुरूवात करण्यात आली. यावेळी उपोषणकर्त्यांनी एक मराठा लाख मराठा, आरक्षण आमच्या हक्काचे, नाही कुणाच्य बापाचे आदी घोषणा देत गिरजा नद थड दणाणून सोडला होता. साखळ उपोषणापूर्वी ग्रामस्थांनी सर्वपक्षी नेत्याना आरक्षण मिळेपर्यंत गावबंदीचा निर्णय घेतला आहे साखळी उपोषणात तरूणांपासू ते वयोवृद्धापर्यंत सकल मराठ समाजबांधव सहभागी झाले.

> सरकारने आता मराठा समाजाचा अंत न पाहता तात्काळ कोर्टात टिकणारे आरक्षण जाहीर करावे, आजवर शांत असणारा मराठा समाज जर आक्रमक झाला तर सरकारला पळता भुई थोडी होईल ! समाधान पाटील नवले



# शहराध्यक्षांनी केले नवरात्रोत्सवानिमित्त 1 हजार प्रतिमांचे वाटप

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** येथे दुर्गादेवी उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. विविध उपक्रम राबवण्यात आले. यामध्ये शहरात भाजपचे शहराध्यक्ष योगेश मिसाळ व त्यांची पत्नी प्रियांका मिसाळ यांनी आई तुळजाभवानी आणि श्री बालाजी यांच्या सुमारे एक हजार प्रतिमा महिलांना वाटप केल्या. बाजार समितीच्या परिसरात असणाऱ्या लक्ष्मीमाता मंदिर, तेली गल्ली, रघू गल्ली, वाघमारे गल्ली, जगधने गल्ली, प्रधान गल्ली, जोगी गल्ली आदी ठिकाणी दररोज शेकडो महिला दांडिया खेळण्यासाठी जात होत्या. या ठिकाणी आलेल्या महिलांना आई तुळजाभवानी आणि श्री बालाजी यांच्या फोटो फ्रेमचे भाजपचे शहराध्यक्ष योगेश मिसाळ व त्याची पत्नी प्रियांका मिसाळ यांच्या पुढारखातून दुर्गादेविी मंडळाच्या पदाधिकाऱ्यांच्या हस्ते वाटप करण्यात आले.

# मंठ्यात रंगणार कविसंमेलन 'पौर्णिमा कवितेची'

आधुनिक केसरी न्यूज

**मंठा :** येथील 'आविष्कार साहित्य मंडळाच्या वतीने दरवर्षीप्रमाणे "पौर्णिमा कवितेची" या शीर्षकांतर्गत कविसंमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. रविवारी (२९ ऑक्टो.) मंठा येथे जि.प.प्रशालेच्या प्रांगणात होणाऱ्या कविसंमेलनात महाराष्ट्रातील नामवंत कवी हजेरी लावणार आहेत. याच सोहळ्यात कॉंग्रेसचे माजी आमदार धोंडीरामजी राठोड यांना मंडळाच्या वतीने 'आविष्कार जीवनगौरव' पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. यावेळी कार्यक्रमाचे स्वागताध्यक्ष म्हणून (उबाठा) शिवसेना जिल्हाप्रमुख ए.जे.बोराडे पाटील, तसेच भाजपा किसान मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष राजेश मोरे व प्रसिद्ध व्यापारी आनंदराम सोमाणी यांची विशेष उपस्थिती असणार आहे. सायंकाळी ७ वाजता सुरू होणाऱ्या बहारदार कविसंमेलनात सुप्रसिद्ध कवी,गीतकार प्रकाश घोडके पुणे, टीव्ही स्टार हास्यसम्राट कवी गौतम गुळधे अमरावती, नितीन वरणकर शेगांव, कवयित्री मधुराणी बनसोड वाशिम, डॉ.प्रभाकर शेळके जालना, कवी प्रा.संजय कावरे अकोला आदी कवी हजेरी लावणार आहेत. मंठा शहरातील व तालुक्यातील काव्यप्रेमी रसिकांनी या कविसंमेलनास मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन आविष्कार साहित्य मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.



वंचित बहुजन आघाडीची काल झालेल्या विराट आदिवासी एल्गार सभेत मा. बाळासाहेब प्रकाशजी आंबेडकर यांच्या उपस्थितीत चि. जय शंकर खरात याच्या वाढदिवसानिमित्त बाळासाहेबांना अकोला लोकसभा निवडणुकीसाठी ५०,००० चा चेक सुपुर्द करण्यात आला. आदिवासी एल्गार सभा मधे तमाम आदिवासी दलित अल्पसंख्याक बांधवांनी एकीचे दर्शन घडवून मोठ्या संख्येने उपस्थित राहिल्या बद्दल शंकर घरात यांनी आभार व्यक्त केले आहे.

# खंडाळ्यात डॉ. भीमराव आंबेडकर यांचे स्वागत

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे नातू डॉ. भिमराव यशवंतराव आंबेडकर हे खंडाळा येथे आले असता त्यांचे स्वागत करण्यात आले.

डॉ. भिमराव आंबेडकर हे लोणंद ता.खंडाळा येथील धम्मपरिषद व धम्मदीक्षा कार्यक्रमासाठी निघालेले असताना त्यांचे स्वागत खंडाळा तालुका डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारक समिती, भारतीय बौद्ध महासभा यांच्या वतीने स्वागत करण्यात आले. डॉ.भिमराव आंबेडकर यांनी खंडाळा येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारक येथे बाबासाहेबांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करीत अभिवादन केले. यावेळी खंडाळा नगरपंचयतीच्या माजी नगराध्यक्षा नंदाताई गायकवाड,खंडाळा तालुका डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारक समितीचे अध्यक्ष प्राचार्य सुरेश खराते, जयकुमार खरात, भारतीय बौद्ध महासभेचे सातारा जिल्हाध्यक्ष श्रीमंत घोरपडे, यशवंत खुंटे व इतर बौद्ध उपासक व उपासिका उपस्थित होते.

डॉ.भिमराव आंबेडकर हे भारतीय बौध्द महासभेचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष म्हणून कारभार सांभाळत असून महाराष्ट्रच नव्हे देशभरात धम्म प्रचार आणि प्रसाराचे काम करत आहेत. लोणंद येथील धम्मपरिषद आणि धम्मदीक्षा समारंभाचे आयोजन त्यांच्या अध्यक्षते खाली करण्यात आले होते. त्यानुसार ते लोणंदच्या दिशेने जात असताना त्यांनी खंडाळा येथे सत्कार स्वीकारला.१९५६ साली डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी बौद्ध धम्माची दीक्षा दिली. आज त्याच बाबासाहेबांचे नातू डॉ.भिमराव आंबेडकर हे खंडाळा तालुक्यात आल्याने एक धम्ममय वातावरण निर्माण झाल्याचे पाहायला मिळाले.




# हिवराळे क्लिनिक अ‍ॅण्ड हर्बल हेल्थ केअर

9130174444

डॉ. के.बी. हिवराळे

आयुर्वेद जनरल फिजिशियन,
ॲक्युपंक्चर तज्ज्ञ

B.A.M.S., N.D.,C.M.S.& Ed(MUMBAI)
R.No.2366/12/2000
एमसीए/2022/10/बी/000839 बॉम्बे नर्सिंग होम परवाना क्र.218, औरंगाबाद

उपलब्ध सुविधा

- जुनाट सांधे दुखी (गुडघे दुखी)
- आम वात उदर रोग
- दमा व ॲलर्जी (जुनाट)
- चिकन गुनिया
- मनोकयीईक आजार
- त्वचा व गुप्त रोग
- स्त्रीयांचे आजार
- स्थूलपणा, मूळव्याध
- वंध्यत्व, संतती प्राप्ती
- कॅन्सर सल्ला, मुतखडा
- वजन वाढविणे
- वजन कमी करणे
- केसांच्या सर्व तक्रारी
- लहान मुलांची
- स्मरणशक्ती वाढविणे



पंचकर्म सुविधा (मुख्यकार्य) 1) वमन, 2) विरेचन, 3) बस्ती, 4) नस्य, 5) रक्तमोक्षन

अजिंठा रोड, सारा कॉलनी, फुलंब्री, ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद



# रा. स्व. संघातर्फे पथसंचलन उत्साहात

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा स्थापना दिन असलेल्या विजयादशमीच्या निमित्ताने मंगळवारी (२४ ऑक्टोबर) सकाळी रा.स्व. संघाच्या पुणे महानगर रचनेतील ५६ नगरांमधून सघोष संचलने काढण्यात आली. नऊ भागातील विविध ५६ नगरांमध्ये काढण्यात आलेल्या संचलनांमध्ये एकूण अकरा हजारांहून अधिक पूर्ण गणवेषातील स्वयंसेवकांनी सहभाग घेतला.

दरम्यान सूस, धानोरी, लोणी काळभोर, उरळी कांचन या शहरालगत असलेल्या भागातही सघोष पथसंचलने निघाली. तिथेही नागरिकांनी पथसंचलनाचे जोरदार स्वागत केले. विविध नगरांमधील मोठ्या सोसायट्यांच्या आग्रहा व विनंतीमुळे संचलनाचे मार्ग हे सोसायट्यांमधून मार्गस्थ होतील अशा प्रकारचे नियोजन करण्यात आले होते. यावरून समाजात संघाविषयीची स्वीकारार्हता वाढल्याचे दिसून येते आहे. विजयादशमी निमित्ताने विविध नगरांमध्ये सकाळी ७.३० वाजता सघोष संचलनांचे आयोजन करण्यात आले होते. संचलनाच्या मार्गावरून नागरिकांनी आकर्षक रांगोळी आणि विविध फुलांच्या व पाकळ्यांच्या सड्यांनी भरून गेलेले दिसत होते. दरम्यान संचलनातील स्वयंसेवकांवर व भगव्या ध्वजावर पुष्पवृष्टी करून जोरदार स्वागत करण्यात आले. विशेष म्हणजे विविध नगरांमध्ये सर्व विविध पक्षांच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी देखील संचलनाचे स्वागत केले. तर पुणे महानगराच्या विविध नगरांमध्ये प्रतिष्ठित व मान्यवर नागरिकांनी प्रमुख पाहुणे यावेळी उपस्थित राहून संचलनाची पाहणी केली.

प्रथेप्रमाणे सकाळी रा.स्व. संघाच्या वैशिष्ट्यपूर्ण घोषातर्फे शिवाजीनगर भागातील एसएसपीएमएस महाविद्यालयाच्या प्रांगणातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला सघोष मानवंदना देण्यात आली. यावेळी संघचालक रवींद्र वंजारवाडकर व कसबा भागाचे संघचालक अ‍ॅड. प्रशांत यादव, रा.स्व. संघाच्या अखिल भारतीय समरसता गतिविधी सह संयोजक रवींद्रजी किरकोळे यांनी शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. त्याआधी रा.स्व. संघाचे पुणे महानगर संघचालक श्री. वंजारवाडकर व कसबा भागाचे संघचालक अ‍ॅड. यादव यांच्या हस्ते मोतीबाग कार्यालयात शंख व भगव्या ध्वजाचे पूजन व ध्वजारोहण करण्यात आले. याप्रसंगी संघाचे पुणे महानगर कार्यवाह सचिन भोसले आदी मान्यवरांची उपस्थिती होती.

दरम्यान संघ कामात अधिकाधिक लोकांचा सहभाग वाढताना दिसतो आहे. अनेक तरूणांनी संघ कार्यात सहभाग वाढवित व संचलनात संपूर्ण गणवेशात सहभागी झालेले दिसून आले. तरूणांसोबत अनेक ज्येष्ठ स्वयंसेवक देखील गणवेशासह संचलनात सहभाग नोंदविला.

# पाण्याच्या टाकीवर जाऊन तरुणांचे आंदोलन

आधुनिक केसरी न्यूज

**वडोद बाजार :** फुलंब्री तालुक्यातील वडोद बाजार येथील चार तरुणांनी वडोद बाजार येथील पाण्याच्या टाकीवर चढून आंदोलनं सुरू केले आहे मराठा समाजाच्या आरक्षणासाठी चार तरुणांनी वडोद बाजार येथील पाण्याच्या टाकीवर जाऊन आंदोलन सुरू केले आहे. मराठा समाजाला आरक्षण मिळावे. यासाठी ची मागणी या तरुणांची असून शासनाकडून मराठा समाजाला आरक्षण देण्यात यावे यासाठी आंदोलनं सुरू आहे. छत्रपती शिवाजी महाराज की जय आरक्षण आरक्षण आमच्या हक्काचे नाही कुणाच्या बापाचं, गुणरत्न सदावर्तेच करायचं काय खाली मुंडक वर पाय, या दळभद्री सरकारचं करायचं काय खाली मुंडक वर पाय, कोण म्हणता देत नाही घेतल्याशिवाय राहत नाही, अशा घोषणा हे युवक देत होतेआंदोलनात हेमंत वाघ भागिनाथ घुले बाबासाहेब शिंगारे अमोल डिडोरे या चार तरुण चार वाजता पाण्याच्या टाकीवर चढले असून हे चारही युवक पाण्याच्या टाकीवर बसून आंदोलनं करीत आहे डोक्यात भगवी टोपी परिधान करून पाण्याच्या टाकीवर भगवा ध्वज लावून अशा प्रकारच्या घोषणा हे योग देत होते. आंदोलनस्थळी गावातील नागरिक जमले होते तर वडोद बाजार पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक विलास मोरे यांनी घटनास्थळी पाहणी केली. पोलिस निरिक्षक मोरे, महसूल विभागाचे मंडळ अधिकारी मिसाळ यांनी या युवकांना खाली उतरण्याची विनंती केली असता या तरुणांनी आरक्षण मिळणार नाही तोपर्यंत आम्ही खाली उतरणार नाही असा पवित्र घेतला आहे.





# लामणगाव शाळेत गणवेश वाटप

आधुनिक केसरी न्यूज

**बाजार सावंगी :** खुलताबाद तालुक्यातील मौजे लामणगाव येथे जिल्हा परिषद शाळेत महाराष्ट्र शासनाचे एक राज्य एक गणवेश या योजनेंतर्गत एक ते आठ वर्गातील शालेय विद्यार्थ्यांना गणवेश वाटप करण्यात आले. त्यामुळे व शालेय मुलांत आनंद दिसून आले. महाराष्ट्र शासनाच्या "एक राज्य एक गणवेश"या योजने अंतर्गत वर्ग 1 ते 8 वी च्या सर्व 127 विद्यार्थ्यांना आज शालेय गणवेश वाटप करण्यात आले. यावेळी शालेय अध्यक्ष विष्णू पा. मालोदे, माजी सरपंच नवनाथ पा. मालोदे, उपसरपंच अशोकभाऊ मालोदे, शालेय सदस्य भागण काका मालोदे, सदस्य किशोर मालोदे, मुख्याध्यापक बी.डी. जाधव, डी. एम. खाडे, विजय भंडारी,मनोज साळुंके, शेख मुस्तफा, संतोष बोबडे गावकरी व विद्यार्थी उपस्थित होते.

# पिंपळगावात विविध विकासकामांचे भूमिपूजन

आधुनिक केसरी न्यूज



**जिंतूर :** तालुक्यातील पिंपळगाव काजळे ग्रामपंचायत अंतर्गत विकासासाठी 20 लक्ष मंजूर करून त्या अंतर्गत गट्टू बसवणे व रस्त्याच्या कामाचे दिनांक 26 ऑक्टोबर रोजी काँग्रेसचे तालुका अध्यक्ष गणेश काजळे यांच्या हस्ते भूमिपूजन करण्यात आले. मागील काही दिवसांपासून पिंपळगाव ग्रामपंचायत अंतर्गत रस्त्याची दुरवस्था झाली होती. शिवाय हनुमान मंदिर परिसरात सुशोभीकरण करणे गरजेच्या असल्यामुळे काँग्रेसचे तालुका अध्यक्ष गणेश काजळे पाटील यांनी पुढाकार घेऊन 90/10 योजने अंतर्गत 20 लक्ष रुपय मंजूर करून घेतले आहेत. यामध्ये जिल्हापरिषद शाळा ते तुकाराम नवले यांच्या घरापर्यंत सिमेंट रस्ता व हनुमान मंदिर परिसरात गट्टू बसविण्यात येणार आहेत. याचे भूमिपूजन गणेश काजळे यांच्या हस्ते पार पडले. यावेळी सरपंच भीमराव वाकळे मा.सरपंच तुकाराम काजळे, पोलीस पाटील भगवानराव काजळे, सुनील काजळे, श्रीपती कऱ्हाळे, सचिन चिभडे, बापूराव काजळे, अंकुश काजळे, विठ्ठलराव काजळे, प्रकाश महाराज काजळे यांच्यासह गावातील जेष्ठ नागरिक उपस्थित होते. यामुळे गावकऱ्यांची रस्त्याची व मंदिर परिसरात सुशोभीकरण होणार असल्याने गावकऱ्यांनी समाधान व्यक्त केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी राम काजळे पाटील यांनी प्रयत्न केले.

# वाघ शिकार प्रकरणात सहा आरोपींना अटक

आधुनिक केसरी न्यूज

**गडचिरोली :** दोन दिवसांपूर्वी चातगाव वन परिक्षेत्रातील अमिर्झा बिटात विद्युत प्रवाहद्वारे वाघाच्या शिकारप्रकरणी वन विभागाने संशयित सहा आरोपींना अटक करण्यात आली आहे. अमिर्झा गावालगतच्या जंगलातील कंपार्टमेंट नं. ४१७ मध्ये जिवंत विद्युत तारेद्वारे वाघाची शिकार करण्यात आली होती. ही घटना २४ ऑक्टोबर रोजी सकाळी ७ वाजताच्या सुमारास उघडकीस आली. वन विभागाने चौकशी अधिकारी नेमून या घटनेची सविस्तर चौकशी सुरू करण्यात आली. दरम्यान, २६ ऑक्टोबर रोजी मिळालेल्या गोपनीय माहितीवरून सहा संशयित आरोपींना अटक करण्यात आली. यात प्रमोद मनोहर मडावी (२९), सुनील केशव उसेंडी (२८), दिलीप ऋषी उसेंडी (२८), प्रकाश दयाराम हलामी (४२), चेतन सुधाकर अलाम (२५) सर्व राहणार मरेगाव टोली व नीलेश्वर शिवराम होळी रा. मोहटोला ता. जि. गडचिरोली आदी आरोपींचा समावेश आहे. आरोपींविरुद्ध वन गुन्हा नोंदवण्यात आला आहे. सदर प्रकरणाची चौकशी गडचिरोली वन विभागाचे उपवनसंरक्षक मिलिश दत्त शर्मा यांच्या मार्गदर्शनात चौकशी अधिकारी तथा सहायक वनसंरक्षक (जंकास) संकेत वाठोरे हे करीत आहेत.



# गोविंद पाटील मुलांचे भावविश्व फुलवणारे बालकवी

## साहित्यिक प्रा.बी.एन.चौधरी : 'मुलं जमिनीवरचे तारे' बाल - किशोर काव्यसंग्रहाचे उत्साहात प्रकाशन

आधुनिक केसरी न्यूज

**जळगाव :** बालसाहित्य हे सहज, सोपे वाटत असले तरी ते लिहणे कठीण काम आहे. बालकांच्या पातळीवर बालसुलभ कथा - कविता लिहणं, म्हणजे मुलांचे भावविश्व फुलवणे. मुलं जमिनीवरची तारे या बाल-किशोर काव्यसंग्रहाच्या माध्यमातून बालकवी गोविंद पाटील यांनी कवितांमधून मुलांचे भावविश्व फुलविले आहे, असे प्रतिपादन खान्देशातील प्रसिद्ध साहित्यिक प्रा. बी.एन.चौधरी यांनी केले. येथील भगिरथ विद्यालयात संपन्न झालेल्या पुस्तक प्रकाशन कार्यक्रमात ते अध्यक्षस्थानावरुन बोलत होते. मुलांचे मनोरंजन करणे म्हणजे भगवंताशी नाते जोडणे, असे पू. साने गुरुजी म्हणत. त्या परंपरेशी गोविंद पाटील यांनी नाळ जुळवली आहे असे प्रा. चौधरी म्हणाले. कार्यक्रमाच्या प्रारंभी मान्यवरांनी सरस्वती पूजन करुन दीपप्रज्वलन केले. त्यानंतर संग्रहाचे कवी गोविंद पाटील यांनी प्रास्ताविकेतून आपल्या कविता लेखनाचा प्रवास उलगडला. पद्मालय देवस्थानचे विश्वस्त हभप ॲड. आनंदराव पाटील यांच्या हस्ते मान्यवरांच्या उपस्थितीत पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. ॲड. पाटील यांनी या प्रसंगी गोविंद पाटील यांना लोककलेचा वारसा त्यांच्या आजोबांकडून मिळाल्याचा गौरवपूर्ण उल्लेख केला. या संग्रहासाठी सुप्रसिद्ध साहित्यिक उध्दव भयवाळ, साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त बाल साहित्यिक आबा महाजन, साहित्यिक विलास मोरे यांचे पुस्तकाबद्दलचे संदेशाचे वाचन करण्यात आले. त्यानंतर साहित्यिक डि.डी. पाटील (जामनेर), भगवान भटकर, प्रकाशक युवराज माळी, भास्करराव चव्हाण, प्रकाश बाविस्कर (जळगाव), आनंदराव पाटील (तळई), रविंद्र पाटील चव्हाण (पाचोरा) मुखपृष्ठकार,आतील चित्र रेखाटणे या वर राजू बाविस्कर यांनी समयोचित मनोगतं व्यक्त केली. आर. डी. कोळी यांनी संग्रहाचे आस्वादक समिक्षण केले. अध्यक्षीय भाषणात प्रा.बी.एन.चौधरी यांनी गोविंद पाटील



यांच्या व्यक्तिमत्वाचा आणि कवितेचा समर्पक शब्दात आढावा घेतला. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन सौ. ज्योती राणे-पाटील यांनी तर आभार प्रदर्शन साहित्यिक भास्करराव चव्हाण यांनी केले. समाज चिंतामणी प्रतिष्ठानने आयोजित केलेल्या या पुस्तक प्रकाशन कार्यक्रमाला जळगाव शहर तसेच जिल्हाभरातून लेखक-कवी-रसिक आणि नातेवाईक, मित्र-परिवाराने मोठी उपस्थिती नोंदविली. गोविंद पाटील यांचे हे तिसरे पुस्तक प्रकाशित झाले. कार्यक्रम यशस्वितेसाठी कृष्णा शिंदे, योगेश जाधव, हेमंत रायसिंग, भानुदास पाटील सामनेर व मित्र परिवार यांनी परिश्रम घेतले.



# मराठा समाज आरक्षणासाठी वडोद बाजार येथे राजकीय पदाधिकाऱ्यांना गावबंदी

आधुनिक केसरी न्यूज

**वडोद बाजार :** राज्यभरात मराठा समाजाच्या आरक्षणासाठी आंदोलन सुरू असून विविध ठिकाणी उपोषण केले जात आहे मराठा समाजाला आरक्षण देण्यात यावे या मागणीसाठी मराठा समाज आक्रमक झाला असून विविध ठिकाणी राजकीय पक्षाच्या पदाधिकाऱ्यांना आता गाव बंदी करण्याचा ठराव सकल मराठा समाजाच्या वतीने घेण्यात येत आहे .
वडोद बाजार येथील सकल मराठा समाजाच्या वतीने ही वडोद बाजार येथे गाव बंदी करण्याचा निर्णय घेण्यात आला. मराठा समाजाच्या आरक्षणाच्या मागणीसाठी राजकीय पक्षाच्या पदाधिकाऱ्यांना वडोद बाजारात गाव बंदी करण्याचा निर्णय वडोद बाजार येथील सकल मराठा समाजाच्या वतीने घेण्यात आला वडोद बाजार येथील मारुती मंदिराजवळील सभागृहात सकल मराठा समाजाच्या पदाधिकाऱ्यांची बैठक घेण्यात आली. या बैठकीत बाजार येथील वडोद बाजार येथील सकल मराठा समाजाच्या वतीने राजकीय पक्षाच्या पदाधिकाऱ्यांना वडोद बाजार गावात बंदी घालण्यात आली आहे मराठा समाजाच्या आरक्षणाचा प्रश्न जोपर्यंत मार्गी लागत नाही तोपर्यंत, (मराठा समाजाला आरक्षण मिळेपर्यंत) वडोद बाजार येथे राजकीय पदाधिकाऱ्यांना प्रवेश बंदी करण्यात आली असून सकल मराठा समाजाच्या वतीने फुलंब्री तहसीलदार यांना निवेदन देण्यात आले असून वडोद बाजार पोलीस ठाण्यात निवेदन देण्यात आले आहे यावेळी वडोद बाजार येथील सकल मराठा समाजाचे पदाधिकारी उपास्थित होते.

# खारघर 'नो लिकर झोन'चे काय होणार?

## जिल्हाधिकारी कार्यालयात बैठकीचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज

**हेमंत धायगुडे**

**पनवेल :** खारघर मध्ये सातत्याने नो लिकर झोनची चर्चा होत




आली आहे. खारघर शहरातील नागरिकांच्या प्रचंड विरोधानंतर देखील खारघरला दारू मुक्त दर्जा कायमस्वरूपी प्राप्त होण्यास अडचणींचा सामना करावा लागत आहे.पुन्हा एकदा या विषयाला वाचा फोडण्याचे काम होताना दिसत असून खारघर शहरातील शेकापचे पनवेल विधानसभा उपाध्यक्ष अजित अडसुळे यांनी उत्पादन शुल्क विभागाकडे लेखी तक्रार केली होती. त्यामुळे दि. २५ ऑक्टोबर रोजी रायगड जिल्हाधिकारी कार्यालयात बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.परंतु सदर बैठक काही अपरिहार्य कारणास्तव स्थगित करण्यात आलेली आहे.सदर बैठक दि. २६ ऑक्टोबर रोजी सकाळी ११.०० वाजता मा.जिल्हाधिकारी रायगड, अलिबाग यांच्या दालनामध्ये होणार आहे.
दारू विक्रीला परवानगी देऊ नये, अशी दारूमुक्त खारघर साठी खारघर संघर्ष समितीच्या वतीने लढा उभारण्यात आला.यासाठी अध्यक्ष संजय जाधव प्रयत्नशील आहेत.खारघर मध्ये नव्याने परवाने दिले जाण्याची दाट शक्यता असल्याने शेकापचे पनवेल विधानसभा उपाध्यक्ष अजित अडसुळे यांनी यासंदर्भात आक्षेप घेतला आहे.याबाबत तक्रारदारांना आपले म्हणणे मांडण्यासाठी निमंत्रित करण्यात आले आहे.यामध्ये पंकज सिकची, संदीप जाधव, मंदार जोशी यांच्यासह आ.प्रशांत ठाकूर, अजित अडसुळे व संघर्ष समितीला याबाबत बैठकीला उपस्थित राहण्यास पत्र दिले आहे. सदर सुनावणीसाठी शहरातील नागरिकांनी, विविध संघटनांनी, राजकीय पक्षांनी मोठ्या संख्येने जिल्हाधिकारी कार्यालयात सुनावणी वेळी उपस्थित राहून खारघर शहराच्या दारू विक्रीला व दारू दुकांनाना विरोध असल्याचे उत्पादन शुल्क विभाग व जिल्हाधिकारी यांच्या समोर मांडावे असे आवाहन संघर्ष समितीचे अध्यक्ष संजय जाधव यांनी केले आहे.

**शहराच्या अस्मितेला तडा :** खारघर शहराला शैक्षणिक वारसा लाभलेला असल्याने शहरात मद्य विक्रीचे दुकाने किंवा हॉटेलमध्ये दारू विक्रीला परवानगी मिळाल्यास शहराच्या 'नो लिकर झोन' अस्मितेला तडा जाणार आहे .त्यामुळे सर्वपक्षीयांकडून दारू विक्रीचे परवाने वितरित करण्यास विरोध होत आहे .
**नागरिकांचा सहभाग :** खारघर शहरात दारूबंदीसाठी मोठ्या प्रमाणात प्रयत्न करण्यात येत असून दारूमुक्त खारघर साठी नागरिकांचा सहभाग अत्यंत महत्वाचा आहे . **मा . संजय जाधव , अध्यक्ष खारघर संघर्ष समिती**
**दारूमुक्त खारघर :** खारघर मध्ये दारू विक्री व बार नको, ह्या साठी शेतकरी कामगार पक्ष नेहमी कार्यरत आहे .शेतकरी कामगार पक्षाची खारघर ग्रामपंचायत मध्ये सत्ता असताना कोणालाच बार आणि वाईनशॉपचा परवाना दिला नव्हता .निरसुख पॅलेसचा परवाना चा वाद चालू असताना परत हॉटेल जे . जे . एस . सर्विसेसला परवाना देणार आहे .त्यावेळी मी स्वत : शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने तक्रार केली . दारूमुक्त खारघर साठी प्रयत्नशील राहणार आहे .
**अजित अडसुळे , उपाध्यक्ष पनवेल विधानसभा, शेतकरी कामगार पक्ष**

गुप्तरोगाबाबत काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट

महावीर घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर